७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ०६ मे २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# १० लाख कर्मचाऱ्यांसाठी तंत्रज्ञान शिक्षणाची ऐतिहासिक झेप

**मुंबई (दै. संध्या)**

- ‘टेक-वारी २.०’ चा शुभारंभ
- उच्च-स्तरीय अंतदृष्टी आणि मानसिक आरोग्य



सामान्य प्रशासन विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाद्वारे आयोजित ‘टेक-वारी २.० – महाराष्ट्राचा तंत्रज्ञान शिक्षण सप्ताह’चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. हा भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी राज्य-नेतृत्वाखालील क्षमता-बांधणी उपक्रमांपैकी एक आहे. मंत्रालयात ४ ते ८ मे २०२६ दरम्यान चालणाऱ्या या कार्यक्रमाचा उद्देश, अत्याधुनिक तंत्रज्ञानाला आरोग्य, प्रशासकीय उत्कृष्टता आणि सांस्कृतिक मूल्यांशी जोडून सुमारे १० लाख सरकारी कर्मचाऱ्यांना सक्षम करणे हा आहे. त्रिमूर्ती प्रांगण येथे झालेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, क्षमता विकास आयोगाच्या (सीबीसी) अध्यक्षा राधा चौहान उपस्थित होते. राज्याच्या प्रगतीमधील आघाडीच्या कार्यकर्त्यांना (फ्रंटलाइन वर्कर्स) व प्रतिनिधींचाही सन्मान करण्यात आला. तबला वादक निलेश परब यांच्या ‘तालरंग: लय आणि सांघिक कार्याचा प्रवास‘ या ऊर्जापूर्ण सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.डिजिटल गव्हर्नन्स यासंदर्भात अमिताभ कांत (माजी सीईओ, नीती आयोग), राधा चौहान (सीबीसी), राजेश अग्रवाल (मुख्य सचिव), सदानंद दाते (डीजीपी, महाराष्ट्र), आणि डॉ. विवेक राघवन (सह-संस्थापक, सर्वम एआय) यांनी डिजिटल प्रशासनाचे विकसित होत असलेले स्वरूप आणि एआय-चालित कार्यक्षमतेचा आढावा घेतला. मानसिक आरोग्य आणि सर्वांगीण विकास: मनशक्ती संशोधन केंद्राने मेंदूच्या क्षमता वाढवण्यावर सत्रे आयोजित केली. साथ मेळा होलिस्टिक हेल्थ कॅम्पने कर्मचाऱ्यांना शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी संसाधने उपलब्ध करून दिली. त्रिमूर्ती प्रांगण एका टेक हबमध्ये रूपांतरित झाले, जिथे १० जागतिक नेत्यांनी थेट प्रात्यक्षिके सादर केली. मेटा (शासनासाठी व्हॉट्सअॅप): एक ‘अॅप-विना‘ गेटवे, जो नागरिकांना व्हॉट्सअॅपवरील सोप्या व्हॉइस कमांडद्वारे वीज, आरोग्यसेवा आणि पोलीस सेवा मिळवण्याची सुविधा देतो. फ्लॅम.अल (व्हिज्युअल एजंट): प्रभावी जनजागृती मोहिमांसाठी एक एआय-नेटिव्ह मिक्स्ड रिॲलिटी प्लॅटफॉर्म, जो कमी क्षमतेच्या स्मार्टफोनवरही १०० मिलिसेकंदांपेक्षा कमी वेळेत चालण्यासाठी डिझाइन केलेला आहे. ‘टेक-वारी २.०’ हे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाद्वारे सह-प्रायोजित आहे. याचा प्रभाव प्रत्येक जिल्ह्यापर्यंत पोहोचावा यासाठी, सर्व सत्रे राज्यातील विशाल मनुष्यबळासाठी थेट प्रक्षेपित (लाइव्ह-स्ट्रीम) केली जात आहेत. हे तंत्रज्ञान प्रदर्शन ८ मे पर्यंत दररोज खुले राहील, जे सरकारी अधिकारी आणि जागतिक तंत्रज्ञान नवोन्मेषकांमध्ये थेट संवादाला प्रोत्साहन देईल.

## संगीत तणावमुक्त जीवनासाठी अत्यंत प्रभावी माध्यम – प्रा. डॉ. मृदुला दाढे

**मुंबई (दै. संध्या)**



आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव हा न मागता मिळणारा घटक बनला आहे. या तणावातून मुक्त होण्यासाठी संगीत हा परमेश्वराने दिलेला सुंदर उपाय असून, सूर आणि लयीच्या माध्यमातून मन एकाग्र होऊन ध्यानावस्था प्राप्त होते. संगीत हे तणावमुक्त जीवनासाठी अत्यंत प्रभावी माध्यम असल्याचे गायिका, लेखिका व मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मृदुला दाढे यांनी सांगितले. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित ‘टेक वारी 2.0 – महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह’ अंतर्गत ‘नादरंग – म्युझिक फॉर स्ट्रेस फ्री लाइफ’ या विशेष कार्यक्रमात प्रा. डॉ. मृदुला दाढे बोलत होत्या. यावेळी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, अपर मुख्य सचिव राधिका रस्तोगी, इतर विभागाचे सचिव, उपसचिव, कक्ष अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात ‘नाद-आराधना’ या संकल्पनेतून निवडक मराठी आणि हिंदी गीतांचा आस्वाद देताना गाण्यांमागील सौंदर्यही डॉ. मृदुला दाढे यांनी सांगितले. निसर्ग, सूर आणि शब्द यांचा संगम श्रोत्यांच्या भावविश्वाला स्पर्श करतो. कठीण परिस्थितीत संगीताची साथ घेऊन त्यामधील सूर आपणाला नक्कीच सकारात्मक दिशा देतील. तसेच संगीताच्या माध्यमातून मानसिक शांतता मिळवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरुवात भक्तीगीताने करण्यात आली. यावेळी गायक निलेश निरगुडकर यांनी डॉ. मृदुला दाढे यांना गायनात साथ दिली. तर की-बोर्ड वादन प्रशांत लळीत, तबला वादन ऋषीराज साळवी, हर्षद काळभाटे, इतर तालवाद व्यंकटेश कुलकर्णी यांनी साथ दिली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**



## सकारात्मक विचार व संवेदनशीलता महत्वाची – मिनोचर पटेल

**मुंबई (दै. संध्या)**



प्रभावी नेतृत्वगुणासाठी बुध्यांक बरोबरच भावनांकही महत्वाचा आहे. नेतृत्व करताना संवेदनशीलपणा, सकारात्मक विचार आणि प्रोत्साहनात्मक वृत्ती महत्वाची आहे. असे मत यशदाचे प्रशिक्षक मिनोचर पटेल यांनी व्यक्त केले. सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात ‘टेक वारी २.०‘ चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विविध विषयांवर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून प्रभावी नेतृत्व या विषयावर यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीचे प्रशिक्षक मिनोचर पटेल यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मिनोचर पटेल म्हणाले की, आपल्या कामातून विश्वासार्हता निर्माण करणे आणि लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणे, त्यांच्याशी संवेदनशीलपणे वागून, कामासाठी प्रोत्साहित करणे म्हणजेच प्रभावी नेतृत्व होय. तुमचा कामाचा अनुभव, सचोटी आणि तुमच्यातील संवेदनशीलता आणि लोकांबद्दलची काळजी या सर्व गुणांचा कामकाजाच्या ठिकाणी योग्य वापर करणे आवश्यक ठरते. जेंव्हा लोक तुमच्यावर विश्वास ठेवतात आणि त्यांना तुमच्या मार्गदर्शनाखाली काम करायला आवडते, तेव्हाच खऱ्या अर्थाने ते तुम्हाला प्रभावी नेतृत्व म्हणून स्वीकारतात. मानसिक व शारीरिक आरोग्य संतुलित ठेवणे महत्वाचे आहे. आनंद हा नेतृत्वाचा मुख्य घटक असून, आध्यात्मिक स्तरावर जीवनातील मूल्ये, उद्दिष्टे व स्पष्टता यांचे भान असणे गरजेचे आहे. शिष्टाचार, व्यावसायिक कौशल्यासोबतच वैयक्तिक आचरणातून विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. भावनिक संतुलन, सामाजिक बांधिलकी, व्यावसायिक शिष्टाचार, शारीरिक आणि मानसिक आरोग्य, कामातील आनंद आणि आध्यात्मिक स्पष्टता. आपल्या कामाचा इतरांवर होणारा परिणाम याची जाणीव ठेवणे हाच यशस्वी नेतृत्वाचा खरा मार्ग असल्याचे पटेल यांनी सांगितले.

# भोंदू अशोक खरातच्या पोलिस कोठडीत वाढ

*TCS प्रकरण संघटित कटाचा भाग; तर नसरापूरच्या आरोपीचे वकीलपत्र घेणार नसल्याची वकिलांची भूमिका*

**नाशिक (दै. संध्या)**



नाशिकमधील अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी भोंदू अशोक खरातला आज कडक पोलिस बंदोबस्तात राहता सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. जमीन खरेदी आणि अवैध सावकारी प्रकरणी शिर्डी पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला असून, सुरक्षेच्या कारणास्तव आरसीपी तुकडीसह मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. या प्रकरणातील गुंतागुंत पाहता, आरोपीने केलेल्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी पोलिसांनी त्याला न्यायालयात सादर केले. तसेच आता अशोक खरातच्या पोलिस कोठडीत वाढ झाली असून आता 9 मे पर्यंत त्याला पोलिस कोठडीत ठेवण्यात येणार आहे.

सुनावणी दरम्यान सरकारी वकील ॲड. गौरव बोर्डे यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपीच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती. आरोपीने जमीन खरेदीसाठी लागणारी कोट्यवधींची रक्कम नेमकी कुठून आणली आणि हे व्यवहार कोणाच्या मदतीने केले, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तपासात खरातचे नाव नॉमिनी असलेली अनेक बँक खाती विविध पतसंस्थांमध्ये आढळली असून, त्यातून मोठे आर्थिक व्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी सखोल तपासाची गरज व्यक्त करण्यात आली. नाशिकच्या टीसीएस कार्यालयातील लैंगिक अत्याचार, विनयभंग आणि कथित धर्मांतर प्रकरणाला आता अधिक गंभीर वळण मिळाले असून, मुख्य आरोपी निदा खान हिचा अटकपूर्व जामीन नाशिक सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणाचे वर्णन 'बहुआयामी आणि संघटित कटाचा भाग' असे केल्याने या प्रकरणातील गुंतागुंत अधिक स्पष्ट झाली आहे. जामीन अर्ज फेटाळल्यामुळे तपास यंत्रणांना या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी मोठी दिशा मिळाली असून, या संघटित कटामागील धक्कादायक बाबी आणि मोठे रॅकेट समोर येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. पुण्याच्या नसरापूर लैंगिक अत्याचार व हत्या प्रकरणी आणखी एक मोठी अपडेट समोर आली आहे. नसरापूर प्रकरणातील आरोपीचे वकील पत्र कोणीही घेणार नसल्याची भूमिका भोर बार असोसिएशनने घेतली आहे. कोणतेही वकील या आरोपीचे वकीलपत्र घेणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भोरच्या वकिलांच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रय उरणकर म्हटले की, हा अत्यंत लांछनास्पद प्रकार होता. हा प्रकार समजल्यानंतर भोर वकिलांच्या असोसिएशनची तातडीने बैठक बोलावली. 2 मे रोजी बैठक झाली आणि सर्वानुमते या नराध्यमाचे कोणीही वकीलपत्र घ्यायचे नाही, त्याला कुठलीही न्यायालयीन मदत मिळाली नाही पाहिजे तसेच भोरमधूनच नव्हे तर पणे जिल्ह्याचाही तसा ठराव केला.

## ब्रेकिंग न्यूज

### डेटा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

मुंबई (दै. संध्या) : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सोशल मीडिया आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे वैयक्तिक डेटाचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. चुकीच्या हातात गेलेला डेटा व्यक्ती, समाज आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकतो. सायबर गुन्हे, डिजिटल अटक, फसवणूक, तसेच डेटा लीकच्या घटनांमुळे याची गंभीरता अधिक असल्याने डिजिटल युगात डेटा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयातील वकील खुशबू जैन यांनी सांगितले. मंत्रालयातील परिषद सभागृहात आयोजित ‘टेक-वारी 2.0’ प्रशिक्षण उपक्रमांतर्गत डिजिटल युगातील डेटा सुरक्षेच्या महत्त्वावर विशेष मार्गदर्शन करताना खुशबू जैन बोलत होत्या. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही राधा यांच्यासह विविध विभागाचे सचिव उपस्थित होते. खुशबू जैन यांनी डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (डीपीडीपी) कायदा, 2023 याविषयी मार्गदर्शनात सांगितले की, 2017 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य केला. त्यानंतरच डेटा संरक्षणासाठी ठोस कायद्याची गरज निर्माण झाली आणि त्यातून डीपीडीपी कायदा, 2023 अस्तित्वात आला.

## व्हिडिओ व्हायरल; पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या

# जळगाव हादरलं, प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार



### बोरिवलीतील खासगी शॉपिंग सेंटरमध्ये दोन मुलींशी गैरवर्तन

बोरिवली येथील एका खासगी शॉपिंग सेंटरमध्ये दोन तरुणींशी कर्मचाऱ्यांनी कथितपणे उद्धटपणे वागल्याची घटना समोर आली आहे. या घटनेविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीव्र निषेध नोंदवत संबंधित व्यवस्थापनाला जाब विचारला आहे. मुंबईत व्यवसाय करताना स्थानिक नागरिकांचा आणि विशेषतः महिलांचा सन्मान राखणे अनिवार्य असल्याचे मनसेकडून स्पष्ट करण्यात आले. कोणत्याही प्रांत किंवा भाषेच्या नावाखाली गैरवर्तन खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला. दरम्यान, संबंधित व्यवस्थापनाकडून या प्रकरणात योग्य कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

**जळगाव (दै. संध्या)**

नाशिकमधील भोंदू अशोक खरातप्रकरणानंतर राज्यातील काही जिल्ह्यातही महिलांवरील अत्याचार आणि व्हिडिओची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. काही दिवसांपूर्वी कोल्हापुरातील एका युवकानेही अशाच प्रकारे मुलींसोबत लैंगिक अत्याचार करुन व्हिडिओ व्हायरल केल्यानंतर आरोपीस अटक केली आहे. आता, प्रेम प्रकरणातून तरुणीला जाळ्यात ओढत तिचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत, पीडितेकडून 7 लाखांची वसुली केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील यश जैन या तरुणाला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर, तरुणाच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यात अजूनही काही तरुणींचे आक्षेपार्ह व्हिडिओ आढळून आल्याने जळगाव जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

जळगाव जिल्ह्यातील लैंगिक अत्याचार आणि व्हायरल व्हिडिओप्रकरणी अटक केलेल्या आरोपीचे नाव यश महेंद्र जैन असे असून त्याला कोर्टात हजर करण्यात आले आहे. चाळीसगावातील तरुणी ब्लॅकमेल प्रकरणात आता नवे तपशील समोर येत आहेत. अटक करण्यात आलेला आरोपी यश महेंद्र जैन याच्या मोबाईलमध्ये इतरही काही मुलींचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ आढळल्याची प्राथमिक माहिती समोर आली. त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. या संदर्भात प्रतिक्रिया देताना पोलीस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी सांगितले की, “तपास सुरू असून काही फोटो व व्हिडिओ आमच्या हाती लागले आहेत. मात्र, याबाबत अंतिम निष्कर्ष तपास पूर्ण झाल्यानंतरच काढता येईल.”

दरम्यान, पोलिसांकडून आरोपीच्या मोबाईलमधील डिजिटल पुराव्यांची सखोल तपासणी सुरू असून या प्रकरणात आणखी इतर मुलींना ब्लॅकमेलिंग झाली आहे का? याचाही शोध घेतला जात आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, पोलिसांनी यश जैन याला कोर्टात हजर केली आहे. मात्र, या व्हिडिओ कांडमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## वडिलांकडून ९ वर्षांच्या मुलीची निर्घृण हत्या




**दौंड (दै. संध्या)**

शाळेच्या गुणपत्रिकेवरून झालेल्या किरकोळ वादातून वडिलांनीच आपल्या ९ वर्षांच्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक घटना दौंड तालुक्यातील देऊळगाव राजे येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी वडिलांसह एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शांताराम दुर्गाधन चव्हाण (वय ३३) आणि चिंगु शिंदाबाद भोसले (दोघे रा. हनुमान वस्ती, काळे वस्ती जवळ, देऊळगाव राजे, ता. दौंड, जि. पुणे) अशी आरोपींची नावे आहेत. शांताराम चव्हाण याची ९ वर्षांची मुलगी अनामिका हिने तिच्या शाळेच्या गुणपत्रिकेवर खाडाखोड केल्याच्या कारणावरून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या रागातून चव्हाण याने घरातील लाकूड कापण्याच्या मशीनने मुलीच्या गळ्यावर, डोक्यावर व गालावर वार करून तिची निर्घृण हत्या केली. इतकेच नव्हे तर गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मुलीचा मृतदेह कपड्यात गुंडाळून घर पेटवून दिले. आगीत अर्धवट जळालेल्या अवस्थेत मुलीचा मृतदेह आढळून आला. ही घटना ३ मे २०२६ रोजी पहाटे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास घडली. त्या वेळी घरात उपस्थित असलेल्या चिंगु भोसले हिनेही ही घटना लपवण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दौंड पोलीस ठाण्याचे पोलिस शिपाई निलेश फडणीस यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा, पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न तसेच इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील उगले करत आहेत. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण दौंड तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये संतापाची तीव्र भावना निर्माण झाली आहे.

# संपादकीय

## अल्पवयीन मुली आणि स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

भोर तालुक्यातील नसरापूर येथे पासष्ट वर्षांच्या नराधमाने चार वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिचा खून केला. अत्यंत निंदनीय असेच हे कृत्य आहे. यापूर्वीही अल्पवयीन मुलींसोबत दोनदा त्याने अशीच कृत्ये करूनही न्यायालयाने त्याला दोषमुक्त जाहीर केले होते. त्याच वेळी उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली असती आणि आरोपीला शिक्षा झाली असती तर ही घटना टळू शकली असती. पोलिसांनीही महिलांविरुद्धच्या प्रत्येक गुन्ह्यात आरोपीला शिक्षा होईपर्यंत, वेळ पडल्यास सर्वोच्च न्यायालयापर्यंत खटला लढवणे गरजेचे आहे. समाजातील ही विकृती कशी रोखायची हा शासन, पोलिस तसेच संपूर्ण समाजापुढे मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. मुंबईतील साकीनाका येथे नुकत्याच एका तरुणीवर अत्यंत क्रूरपणे बलात्कार करून एका निर्जन ठिकाणी टाकण्यात आले व थोड्याच वेळाने बेशुद्धावस्थेतच तिचा मृत्यू झाला. ठाण्यात एका अल्पवयीन मुलीवर गेले अनेक महिने ३०-३२ तरुणांनी सातत्याने बलात्कार केले; ज्यात काही अल्पवयीन मुलेही होती. अत्यंत उद्वेग निर्माण करणाऱ्या या अशा घटना केवळ पुणे, मुंबई, ठाण्यापर्यंतच मर्यादित नसून सर्वच शहरांमध्ये, गावांमध्ये वारंवार घडत असल्याचे नजरेस येते. यातील अनेक पीडिता अल्पवयीन मुली असतात. फेसबुक, व्हॉट्सॲप यांसारख्या समाजमाध्यमांच्या मदतीने विश्वास निर्माण करणे, प्रत्यक्ष भेटीसाठी बोलावणे, त्यानंतर शारीरिक संबंध प्रस्थापित करणे, त्याचा व्हिडीओ तयार करणे, शस्त्रांचा धाक दाखवणे, ब्लॅकमेल करणे व अत्याचार चालू ठेवणे असे प्रकार उघडकीस येत आहेत. शारीरिक छळ करणे, वर्दळीच्या ठिकाणी छेड काढणे याशिवाय मोबाइल, ई-मेल या माध्यमातून सायबर छळाचेही प्रमाण बरेच वाढताना दिसते आहे. बहुतेक घटनांमध्ये लैंगिक अत्याचार करण्यात ओळखीचे लोक, नातेवाईक, शेजारी हेच जास्तीत जास्त आरोपी म्हणून निष्पन्न झाले आहेत. अशा 'परिचित' व्यक्तींविरुद्ध तक्रार करायला पीडिता तयार होत नाहीत, मुलीने तक्रार करू नये, यासाठी पालक दबाव आणतात, पीडिता हीच जणू काही दोषी आहे, अशी वागणूक समाजातून दिली जाते. हे ओळखून अल्पवयीन मुलींनी ओळख असलेल्या किंवा विश्वासू वाटणाऱ्या कोणत्याही पुरुषांबरोबर एकट्याने राहताना जास्तीत जास्त खबरदारी घेणे व शरीरसंबंध ठेवण्यास विरोध करणे आवश्यक आहे. अशा प्रसंगात ११२ या भारत सरकारने आपत्कालीन मदतीसाठी सुरू केलेल्या ॲपच्या माध्यमातून तत्काळ पोलिस मदत मिळवावी. याशिवाय सायबर पोलिसांची टोलमुक्त हेल्पलाइन १५५२६० वर संपर्क करावा. शासनाने बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये २ महिन्यांत दोषारोपपत्र ठेवणे बंधनकारक केले आहे व यासाठी जलदगती न्यायालये स्थापन केलेली आहेत. छेडछाडीच्या घटनांमध्ये पीडितेचा जबाब व अन्य पुरावा एकत्र करून पोलिसांनी चोवीस तासांत दोषारोपपत्र तयार करणे बंधनकारक करणे आवश्यक आहे. त्यामुळे समाजात विश्वास उत्पन्न होईल. महिला पोलिसांनी आपल्या हद्दीतील महिला बचतगट सदस्या, महिलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने शाळा व महाविद्यालयांतील मुलींसाठी ठिकठिकाणी प्रत्यक्ष अथवा 'झूम'सारख्या ॲपची मदत घेऊन जनजागृती करणे, महिलांमध्ये व अल्पवयीन मुलींमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. अत्याचाराचे बळी असणाऱ्या पीडितांशी संवाद साधून त्यांना पोलिस स्टेशनमधे तक्रार करण्यास प्रोत्साहित करणे, न्यायालयात त्यांना खंबीर आधार देऊन सत्य सांगण्यास पाठिंबा देणे आवश्यक आहे. पोलिसांनीही 'महिला पोलिस मित्र' ही संकल्पना राबवून, ज्या ठिकाणी पोलिस उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी महिला पोलिस मित्रांच्या मदतीने अल्पवयीन मुलींशी संवाद स्थापन करणे जरूरीचे आहे. समाजानेही या पीडितांच्या बाबतीत आपला दृष्टिकोन बदलून त्यांना सतत मानसिक आधार मिळेल, याची खात्री करावी.

## विनोदी विश्व

एक मित्र – आज माझ्याबरोबर जेवण करण्यास तुझी काही अडचण नाही ना?
दुसरा मित्र – अजिबात नाही, उलट मला आनंदच होईल.
पहिला मित्र – फारच छान, मग मी तुझ्याकडे १० वाजता येतो जेवायला.

## गुरु वचन

### त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक–परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखाम ध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

## उपदेशकथा

### दानाचे मोल

राज्यात ओला दुष्काळ पडला होता. राजा प्रतापरावांनी साऱ्या शेतकऱ्यांचा सारा माफ केल्याचे जाहीर केले. अन्नही मोफत दिले जाईल, अशी दवंडी दिली. त्यांना वाटले की, आता सगळे खूश होऊन जातील, आपली स्तुती करतील. ती स्तुती ऐकावी म्हणून धान्य घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या रांगेत जाऊन ते उभे राहिले. त्यांच्या पाठीमागे दोन शेतकरी येऊन उभे राहिले. ते शेतकरी आपापसांत कुजबुजत होते. आपले महाराज शूर आहेत. दानशूरसुद्धा आहेत पण त्यांना व्यवहार समजत नाही.

दुसरा शेतकरी दबल्या आवाजात म्हणाला, का रे ? फ ुकटचं धान्य खाऊन वर मस्तीला आलास का ? राजांना नाव ठेवतोस ? पहिला शेतकरी म्हणाला, अगदी बरोबर बोललास. गेले महिनाभर मला काही काम न करता असे फुकटंच खाण्याची सवय लागली आहे. मस्ती आल्याशिवाय कशी राहील ? यापेक्षा महाराजांनी आपल्याकडून श्रमदानाची कामे करुन घ्यायला हवी होती. काम मगच दाम हे धोरण त्यांनी राबवायला हवे होते. राजा प्रतापरावांनी हा सल्ला मानला. त्यामुळे दानाचा दुरुपयोग टळला.

## सुविचार

आयुष्य हे दुचाकी चालविण्यासारखे आहे. तुमचा तोल सांभाळण्याकरता तुम्हाला पुढे जात राहीले पाहिजे.

– अल्बर्ट आइनस्टाइन

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:चतुर्थी ०७:५१:३० |
| ६ मे २०२६ | नक्षत्र:मूल १५:५३:२६ |
| बुधवार | योग:सिद्ध २५:११:३३+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव ०७:५१:३० |
| श्रावणशके संवत्– १९४८ | करण:कौलव २१:०४:०१ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:मेष |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:धनु |
| मास– वैशाख | हिजरी सन् – १४४५ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्काद |
| कृष्ण पक्ष | तारीख – १९ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | | | 3 | | 5 | 2 |
| | 3 | | 9 | | 7 | | | |
| 8 | 4 | 6 | 2 | | | | 3 | |
| 7 | | | | 5 | | 4 | 6 | |
| | 8 | 3 | | | | 2 | 1 | |
| | 6 | 5 | | 2 | | | | 3 |
| | 9 | | | | 8 | 5 | 4 | 6 |
| | | | 5 | | 2 | | 9 | |
| 3 | 5 | | 6 | | | 8 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९३९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | 6 | 3 | 4 | 5 | 1 | 2 | 9 |
| 3 | 4 | 1 | 6 | 2 | 9 | 7 | 5 | 8 |
| 5 | 9 | 2 | 7 | 8 | 1 | 6 | 3 | 4 |
| 1 | 6 | 4 | 9 | 3 | 8 | 2 | 7 | 5 |
| 9 | 5 | 8 | 1 | 7 | 2 | 3 | 4 | 6 |
| 2 | 3 | 7 | 5 | 6 | 4 | 8 | 9 | 1 |
| 7 | 8 | 9 | 4 | 1 | 3 | 5 | 6 | 2 |
| 6 | 2 | 5 | 8 | 9 | 7 | 4 | 1 | 3 |
| 4 | 1 | 3 | 2 | 5 | 6 | 9 | 8 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस


### आंतरराष्ट्रीय

- २००६ – इस्त्राइलच्या हवाई हल्ल्यात पाच पॅलेस्टिनी ठार झाले.
- २००७ – ब्रिटमधील एका ४१ वर्षीय कोट्यधीश महिलेने चक्क सैन्डी नावाच्या डॉल्फिनशी विवाह केला.
- २००७ – रामनरेश सरवन भारतीय वंशाचा असलेला वेस्ट इंडीज क्रिकेट संघाचा कर्णधार बनलेला चौथा व्यक्ती ठरला.

### राष्ट्रीय

- २००६ – पाटणा येथे झोपडीच्या बाहेर झोपलेल्या लोकांच्या अंगावरून एक बस गेल्याने पाच जण ठार झाले.
- २००७ – कोलकाता येथे भारतीय संघाचा धडाकेबाज फलंदाज महेंद्रसिंग धोनीचे एका मुलीने सुरक्षा व्यवस्था तोडून आय लव्ह यू म्हणत चुंबन घेतले व अलिंगन दिले.

### जन्म



- १८६१ – मोतीलाल नेहरू, भारतीय क्रांतिकारी.

### निधन

- ०६८० – खलिफा म्वाइयाह.



- १९२२ – छत्रपती शाहू महाराज.
- १९२२ – मारिया माँटेसरी.
- २००७ – अली बाकर, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक.

प्रतिवार्षीक पालन
हॉलोकॉस्ट स्मृति दिन – इस्त्रायल

## : SMS :

2 Aadmiyon ki BV gum ho gai.
Ek bola: Teri BV kesi hai?
Dosra: Blue Eyes, Rosy Lips and Charming, Aur teri kesi hai?
Pehla: Meri chor teri dhondhtay hain.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.६ | २४.१ |
| अहमदनगर | ३६.३ | २२.२ |
| अकोला | ३९.४ | २७.४ |
| अमरावती | ३८.९ | २७.८ |
| बीड | ४०.९ | २९ |
| भंडारा | ४१.२ | २९.६ |
| बुलढाणा | ३१.९ | २३.८ |
| चंद्रपूर | ४२.२ | ३० |
| चेन्नई | ४५.६ | ३० |
| नवी दिल्ली | ३२.८ | २५.९ |
| धुळे | ४१ | २५.३ |
| गोंदिया | ४१.९ | २९.६ |
| जळगाव | ३९.९ | २७.४ |
| कोल्हापूर | ३५.८ | २१ |
| लातूर | ३६.१ | २५.७ |
| मुंबई | ३८.५ | ३१.५ |
| नागपूर | ३९.४ | २८.१ |
| नांदेड | ३७.९ | २७.१ |
| नंदूरबार | ३८ | २६.५ |
| नाशिक | ३६.२ | २२.४ |
| पुणे | ३३.६ | २१.१ |
| पंढरपूर | ३७.७ | २५.३ |
| सातारा | ३५.६ | १८.८ |
| सांगली | ३७.१ | २१.४ |
| सोलापूर | ३७.७ | २६.३ |
| वर्धा | ४०.१ | २८.४ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** केसरी – काळा, शुभ दिशा – पश्चिम परिवाराच्या मदतीने पुढे जाल. व्यावसायिक कार्यात फायदा होण्याची शक्यता.

**वृषभ :** शुभ रंग – निळा, शुभ दिशा – उत्तर आर्थिक कामे पूर्ण होतील. परिवाराकडून सहकार्य मिळेल. काही नवीन योजना हाती घ्याल.

**मिथून :** शुभ रंग–लालसर, शुभ दिशा–पश्चिम व्यावसायिक अथवा जीवनातील समस्या वाढण्याची शक्यता. कौटुंबिक चिंता सुटेल.

**कर्क :** शुभ रंग–चॉकलेटी, शुभ दिशा–दक्षिण चातुर्याने काम केल्यामुळे वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.

**सिंह :** शुभ रंग – काळा, शुभ दिशा – उत्तर वरिष्ठ लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल. चातुर्याने काम केल्यास यश निश्चित.

**कन्या :** शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा–पश्चिम व्यावसायिक जबाबदारी व्यवस्थित पार पाडा. प्रवास सुखाचा होईल. आर्थिक स्थिती उत्तम राहील.

**तूळ :** शुभ रंग–काळसरपांढरा, शुभदिशा–उत्तर आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग–काळा, शुभ दिशा–उत्तर मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. उद्योग धंदा चांगला चालेल.

**धनू :** शुभ रंग – हिरवा, शुभ दिशा – पश्चिम आवक – जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर :** शुभ रंग – लाल, शुभ दिशा – पश्चिम नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील.

**कुंभ :** शुभ रंग – निळा, शुभ दिशा–पश्चिम व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने फळ कमी मिळेल.

**मीन :** शुभ रंग: काळा शुभ दिशा : दक्षिण वाद–विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४०

**आडवे शब्द**

१. विलंब, उशीर
४. हृदयाचा आवाज
६. तात्काळ उत्तर देणारा
१०. श्वासोच्छ्वासाची क्रिया
११. गाय
१२. जुळे
१३. नोकरी नसलेला
१४. सदोदित, एकसारखे
१६. चेहरा
१७. कशा प्रकारचा
१९. धमकी
२०. अंधार दूर करणारा
२२. शब्दांचा स्वरबद्ध करणारा
२६. नवरामुलगा
२८. शाहिराचे वाद्य
२९. श्रीयुत
३०. शिखराचे टोक
३१. सहाचा फटका
३३. मृत्यू, वेळ
३४. प्रामाणिक, सज्जन
३५. विरोध, प्रतिबंध
३७. तारेवर तोल सांभाळण्याचा खेळ की व्यायाम?
४०. बडबड, त्रासदायक बोलणे
४२. यात्रेस जाणे, हेलपाटा
४४. तळ्यात उमलणारे फूल
४६. लोणी काढण्यासाठी लाकडी दांड्याची चांगली!
४७. लांबविलेली बडबड
४८. उलटीपूर्वीची स्थिती
५०. नाकात भरण्याची तंबाखू
५२. पेंद्याचे बोबडगीत– 'किसना, --- रे अपुल्या गाई, आम्ही अपुल्या घरासी जातो भाई!'
५४. अंत:करण
५५. होडी
५६. जाडसर, रवाळ पीठ
५८. सोने
६०. भांड्याला केल्यास ठीक, डोक्याला कशाला हवी?
६१. वितरण
६३. शेवटच्या श्वासाचा आवाज
६५. सरोवर, तळे
६६. वितभर असून साडेतीन हाताला राबवणारे
६७. जवळचे संबंध
६९. पाताळ
७१. पोस्ट ऑफिस (हिंदी)
७३. आवाज, गोंगाट
७५. कारण, निमित्त
७७. वैताग, बडबड
७८. जगातील दोनच जाती!
७९. वाळवी, उणीव
८०. हे असल्यास कंगव्याची काय गरज?

**उभे शब्द**

२. अनेक रंगांचे
३. परमेश्वर
४. श्रीमंत
५. आभाराचा शब्द
६. जिवणीचे टोक
७. रात्रंदिवस
८. बस्तान
९. लहान मूल
१५. रम्य, मनोहर
१८. ओढ्यावरील छोटा पूल
२१. घाव
२२. आनंद
२३. हिंदी फोडणी
२४. पातकी (हिंदी)
२५. पहारा करणारा
२६. तोटी
२७. मंदिर
३०. सर्वत्र सांगत सुटणे
३२. प्रफुल्लित
३३. कावळा
३६. कणीदार
३८. मृत्यूदेवता
३९. शिव्याशाप
४०. आशीर्वाद
४१. पत्र
४३. आरोप
४५. अनुमती
४८. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
४९. मज्जाव, प्रतिबंध
५१. पोपट
५३. घरातील मधली खोली
५७. लढा, भांडण
५९. हेतू, कारण
६१. मार्ग
६२. उथळ आकार
६४. पृथ्वी
६६. थिल्लर, अपरिपक्व
६८. चटकन, त्वरित
७०. 'उगाच कशाला' असा त्रास
७२. खबदाड
७४. पैशाची भर?
७६. बगळा
७७. मनाचा ओढा

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९३९ चे उत्तर

आडवे उत्तर
१.आटपाटनगर ८.मसलत १२.नरडीचा घोट घेणे १३.क्षमावंत १४.चीत्कार १६.रमणी १८.जरतर २१.वेरूळ २२.नयनबाण २४.नवागत २६.समा २७.स्तूप २९.नारळ ३०.वारसदार ३३.राजस ३५.रमा ३७.पनवती ३८.यमनगरी ४०.अजगर ४१.तनय ४२.नापास ४४.धनको ४६.नवथर ४८.मधु ५०.मामी ५१.वास ५२.व ५३.वारकरी ५४.जकातनाका ५७.कनक ५९.भाकरी ६१.लखोटा ६२.पारावार ६४.गायक ६५.क्षमायाचक ६८.सवाल ६९.वावडी ७०.लकवा ७३.तपास ७४.कौसल्या ७५.लाट ७६.कळक

उभे उत्तर : २.टणत्कार ३.टन ४.नरम ५.गडी ६.रचाई ७.वाटसरू ८.मणेर ९.लक्षणीय १०.तमा ११.कातरण १४.चीजवस्तू १५.रतन १७.मन मारणे १९.रवाना २०.कातळ २१.वेगवान २३.नजरानजर २५.गरगरीत २६.सदा २८.परम ३१.रवळनाथ ३२.सती ३४.समरभूमी ३६.मानपान ३७.पलायन ३८.यक्ष ३९.खस ४३.पारवा ४४.धसका ४५.कोयना ४७.वदन ४८.मकबरा ४९.धुरी ५०.मालक ५१.वाजतगाजत ५५.तडक ५६.काललवण ५७.कटाक्ष ५८.कन्हैय्या ५९.भारवाहक ६०.रीत ६२.पाककला ६३.वास ६६.माणूस ६७.चल ७१.वाट ७२.पोक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जिल्ह्यात 66 हजाराहून अधिक नागरिकांनी केली स्व-गणना-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दैनिक संध्या) : भारताच्या १६ व्या जनगणनेला १ मे पासून सुरुवात झाली असून आजअखेर जिल्ह्यातील ६६ हजार १९३ इतक्या नागरिकांनी स्व-गणना केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली नागरिकांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करुन १५ मे २०२६ अखेर कालावधीत स्व-गणना पूर्ण करावी. स्व-गणना ही ऐच्छिक आहे. माहिती गोळा करण्यासाठी आणि नोंदविण्यासाठी प्रगणक १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रत्येक घराला भेट देणार आहे. यावेळी प्रगणकांद्वारे गृहगणना करण्यात येणार असून नागरिकांनी आपल्याशी निगडित अचूक माहिती त्यांना द्यावी. आपल्या परिसरातील नागरिकांनाही अद्ययावत माहितीसह स्व-गणना करण्यास प्रोत्साहित करावे, जिल्ह्यातील सर्व आपली जबाबदारी मानून या प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

### वनपट्टा धारक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी नोंदणी बाबत आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : राज्यात अँग्रीस्टॅक योजनेअंतर्गत वनपट्टे धारक शेतकऱ्यांची फार्मर आयडी नोंदणी करण्याचे काम सुरू असून या प्रक्रियेला अधिक गती देण्याचे निर्देश शासन स्तरावरून देण्यात आले आहेत. कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्ह्यांनी या मोहिमेला प्राधान्य देऊन कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वनपट्टे धारक शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय अधिकारी तसेच कृषी विभाग यांच्यामार्फत समन्वयाने काम सुरू आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून वनपट्टे धारक शेतकऱ्यांची फार्मर आयडी नोंदणी सुरू असून ४ मे २०२६ पर्यंत प्राप्त अहवालानुसार एकूण २८०५ शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये नोंदणीचा वेग अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम राबवून शिल्लक शेतकऱ्यांची नोंदणी तत्काळ पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ग्रामीण भागात जनजागृती करून वनपट्टे धारक शेतकऱ्यांना फार्मर आयडी नोंदणीचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक असून, नजीकच्या सुविधा केंद्रांमार्फत सदर नोंदणी प्रक्रिया करणेबाबत वनपट्टा धारक शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून अँग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी नोंदणी मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे संचालक (अँग्रीस्टॅक) अंकुश माने यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.




### बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी

आंबेगाव खुर्द (दैनिक संध्या) : विश्वरत्न फाउंडेशनच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडला. सकाळी हनुमान नगर चौक येथे बुद्ध वंदना व खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धम्मबंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धापूर्वक सहभाग नोंदवला. सकाळच्या कार्यक्रमात अनुप सर यांनी सूत्रसंचालन व मार्गदर्शन केले. तसेच फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र पारखे यांनी "बुद्धाची मैत्री" हा संदेश देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विश्वरत्न फाउंडेशनचे कार्याध्यक्ष सुभाष खडसे, अध्यक्ष मधुकर लोखंडे, उत्सव प्रमुख प्रभाकर शेंडगे, नितीन ओव्हाळ, सुनील कांबळे, निलेश जाधव तसेच मंडळाचे सदस्य उपस्थित होते. दरम्यान, प्रशांत कांबळे यांच्या मुलगा ओम यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वडिलांनी वाढदिवस व बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून लाडू वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला, ज्यामुळे कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर संध्याकाळी पारखे कॉर्नर बिल्डिंगच्या टेरेसवर प्रवचनाचे आयोजन करण्यात आले. प्रवचनातून भगवान बुद्धांच्या शिकवणीचा संदेश देत समाजात समता, बंधुता आणि शांततेचा विचार रुजवण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन उत्तम प्रकारे करण्यात आले असून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. विश्वरत्न फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




### दगडूशेठ गणपती मंदिरावर अंगारकीनिमित्त 'दाक्षिणात्य' पुष्पआरास

पुणे (दैनिक संध्या) : अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला 'दाक्षिणात्य' पद्धतीची पुष्पआरास करण्यात आली. मंदिराच्या पायथ्यापासून ते कळसापर्यंत विविधरंगी फुलांनी मंदिर सजले. कळसावरील फुलांमध्ये विविध देवतांच्या प्रतिमा देखील साकारण्यात आल्या. चतुर्थीनिमित्त भाविकांनी पहाटेपासून गणरायाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक पार पडला. त्यानंतर सकाळच्या व दुपारच्या सत्रात गणेशयागाचे देखील आयोजन करण्यात आले होते. मंदिराच्या पुढच्या बाजूला फुलांमध्ये गजराजाच्या प्रतिमा साकारण्यात आल्या आहेत. तसेच पुष्प सजावटीकरिता यंदा देशी फुलांचा वापर करण्यात आला. यामध्ये झेंडू, शेवंती या फुलांचा प्रामुख्याने समावेश होता, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

# ॲकॉर्डियनच्या सुरांनी उलगडले सुवर्णकाळातील गाण्यांचे जादुई विश्व

**'ॲन इव्हिनिंग विथ ॲकॉर्डियन'मध्ये ॲकॉर्डियन वादक अमित वैद्य यांचे सादरीकरण**

पुणे (दै. संध्या)



'प्यार हुआ इकरार हुआ', 'आजा सनम मधुर चांदनी में हम', 'बाबूजी धीरे चलना' आणि 'आईये मेहेरबान' यांसारख्या ॲकॉर्डियनच्या सुरांनी सजलेल्या अजरामर गीतांनी 'ॲन इव्हिनिंग विथ ॲकॉर्डियन' या कार्यक्रमात रसिकांना मंत्रमुग्ध केले. ॲकॉर्डियन वादक अमित वैद्य यांनी आपल्या वादनातून या गाण्यांतील खास सुरावटी पुन्हा जिवंत करत प्रेक्षकांना हिंदी चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळात नेले.

'ॲन इव्हिनिंग विथ ॲकॉर्डियन' या कार्यक्रमात ॲकॉर्डियन वादक अमित वैद्य यांनी प्रेक्षकांना अविस्मरणीय संगीतसफरीवर नेले. कोथरूड येथील एमईएस बालशिक्षण ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कर्नल प्रसाद मिजार, अमित आपटे, देसाई बंधू आंबेवाले चे नरेंद्र देसाई उपस्थित होते. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते राज कपूर (२०२४), ज्येष्ठ संगीतकार सलील चौधरी (२०२५) आणि ओ. पी. नय्यर (२०२६) यांच्या जन्मशताब्दीनिमित्त हा कार्यक्रम त्यांना समर्पित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात 'वो चांद खिला' आणि 'प्यार हुआ इकरार हुआ' या गाण्यांनी होताच वातावरण सुरेल झाले. त्यानंतर 'बन के पंछी गाये प्यार का तराना', 'दिल की नजर से', 'आजा सनम मधुर चांदनी में हम', 'जहां मैं जाती हूं' आणि 'हर दिल जो प्यार करेगा' या गीतांनी प्रेक्षकांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. 'आहाहा रिमझिम के ये प्यारे प्यारे' आणि 'दिल से दिल की डोर बांधू' यांसारख्या गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमात 'मधुमती' चित्रपटातील शीर्षक गीत आणि 'जुल्मी संग आंख लड़ी' या गाण्यांचे ध्वनीमुद्रण सादर करण्यात आले. त्यानंतर 'आजा रे परदेसी' आणि 'इतना न मुझसे तू प्यार बढ़ा' या गीतांनी रसिकांना भारावून टाकले. 'प्रेमपत्र' चित्रपटातील 'सावन की रातों में' या गीताच्या ध्वनीमुद्रणातून संवाद आणि निसर्गध्वनींचा सुंदर वापर दाखवण्यात आला. विशेष सादरीकरणातून ॲकॉर्डियन वादनातील वेगळा प्रयोग श्रोत्यांना अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतकार सलील चौधरी यांच्या प्रसिद्ध कवितांपैकी एक असलेल्या "एक गुच्छ चाबी..." या कवितेचा मराठी अनुवाद केतकी वैद्य यांनी सादर केला. संगीतकार सलील चौधरी यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संगीतशैलीचे दर्शन घडवणारा एक आगळावेगळा कार्यक्रम रंगला.

कार्यक्रमात मधुमती चित्रपटाचे शीर्षक संगीत सादर करून सलीलदांच्या शीर्षक संगीत रचनेतील अफाट प्रतिभा उलगडण्यात आली. या प्रारंभीच्या संगीतामधून संपूर्ण चित्रपटाची कथा थोडक्यात आणि प्रभावीपणे कशी व्यक्त होते, हे प्रेक्षकांना अनुभवता आले.

याशिवाय मेमदीदी मधील "बचपन ओ बचपन" आणि मधुमती मधील "जुल्मी संग आँख लड़ी" या गाण्यांच्या ऑडिओ क्लिप्स सादर करण्यात आल्या. या माध्यमातून सलीलदांच्या खास शैलीतील कॉन्ट्रा मेलडीची अनोखी मांडणी अधोरेखित करण्यात आली.

कार्यक्रमात सादर झालेल्या लाईव्ह डेमोने विशेष लक्ष वेधले. यात अमित आपटे यांनी "ए दिल कहाँ तेरी मंजिल" या गाण्याची मुख्य धून सादर केली, तर त्यांच्या पत्नी केतकी वैद्य यांनी आपल्या आवाजातून पार्श्वसंगीत साकारत कॉन्ट्रा मेलडीची प्रभावी अनुभूती प्रेक्षकांना दिली.

समारोपाच्या सत्रात 'बाबूजी धीरे चलना', 'आईये मेहेरबान', 'पिया पिया पिया जिया पुकारे' आणि 'चैन से हमको कभी' या गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध करत कार्यक्रमाची सांगता झाली. अमित वैद्य यांना पद्माकर गुजर (ढोलक) आणि विनोद सोनवणे (ऑक्टोपॅड) यांनी सुरेख साथसंगत केली. संपूर्ण कार्यक्रमात ॲकॉर्डियनच्या सुरांनी रसिकांना एका वेगळ्याच संगीतमय विश्वाची अनुभूती दिली. सुहास किर्लोस्कर यांनी निवेदन केले. कार्यक्रमाच्या शेवटी केतकी वैद्य यांनी आभार मानले.

## सत्ताधाऱ्यांविरोधात एकजुटीने व सातत्यपूर्ण संघर्ष करण्याची गरज

**'लोकशाही संवाद' कार्यक्रमात विचारवंताची भूमिका; महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे पाच वैचारिक अभियानांचे उद्घाटन**

पुणे (दै. संध्या)




हुकुमशाही वृत्तीच्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात एकजुटीने तीव्र आणि सातत्यपूर्ण संघर्ष करण्याचा निर्धार आणि जनतेसमोर सतत आपली भूमिका मांडत राहण्याची गरज आहे, अशी भूमिका विचारवंतांनी मांडली. लोकशाहीची पुनर्स्थापना, संविधानाचे पावित्र्य आणि तळागाळातील जनतेपर्यंत नव्याने नाते जोडण्याचा संकल्प युवक काँग्रेसने हाती घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित 'लोकशाही संवाद' कार्यक्रमांतर्गत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी झटणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर, ज्येष्ठ विचारवंत कॉ. गोविंद पानसरे, ज्येष्ठ साहित्यिक एम. एम. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश व रोहित वेमुला यांच्या नावाने वैचारिक अभियानाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनीष शर्मा, ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी, विधिज्ञ ॲड. असीम सरोदे, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पानसरे व हमीद दाभोलकर यांनी विचार मांडले. लोकशाही संकल्पवृक्षाला पंचनद्यांचे संकल्पजल अर्पण करून अभियानांची सुरुवात झाली.

घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ नेते उल्हास पवार, माजी आमदार मोहन जोशी, अभय छाजेड, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, माजी महापौर प्रशांत जगताप, राष्ट्रीय युवक काँग्रेसचे महासचिव व महाराष्ट्र प्रभारी अजय चिकारा, सहप्रभारी शाम्भवी शुक्ला, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, सरचिटणीस महेश म्हेत्रे, भूषण रानभरे, अक्षय जैन, प्रदेश सचिव विश्वजीत जाधव, विकास सुपनार, ओंकार मोरे, नेहल देशमुख, श्रद्धा कांगे आदी उपस्थित होते. मनीष शर्मा म्हणाले, "राजकीय पक्ष म्हणून काँग्रेस काळाबरोबर पुढे जात नाही, अशी जनतेची समजूत दिसते. ही समजूत खोडून काढण्यासाठी आपण अधिक एकजुटीने व सातत्याने जनतेसमोर गेले पाहिजे. सध्याचे सत्ताधारी एका आर्थिक प्रारूपाच्या माध्यमातून सत्ता राबवत आहेत. काँग्रेस मात्र गांधीजींनी दिलेल्या सर्वसमावेशक भूमिकेवर काम करत आहे. कामगार, श्रमिक, मजूर, कष्टकरी, महिला, शोषित, वंचित साऱ्या समाजघटकांसाठी काँग्रेस कार्यरत असल्याने मोठा जनाधार होता. हा जनाधार पुन्हा काँग्रेसला मिळवून देण्यासाठी येणाऱ्या काळात संघर्ष आणि नवनिर्माण, अशा दोन पातळ्यांवर लढावे लागेल.

## महावितरणच्या कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांना पोलीस महासंचालक पदक

पुणे (दै. संध्या)



महावितरणच्या कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्रीमती अपर्णा गिते यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल मानाच्या पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महावितरणसह पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. श्रीमती अपर्णा गिते यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीत अत्यंत कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सार्वजनिक हितासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन त्यांना या पदकाने गौरवण्यात आले आहे. महावितरणमध्ये कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) या पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांनी वीज चोरी रोखणे, अंमलबजावणी व सुरक्षा यंत्रणेत समन्वय साधणे आणि विभागात शिस्तबद्ध कार्यक्षमता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अंमलबजावणी व सुरक्षा विभागाने विविध महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. श्रीमती गिते यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महावितरण प्रशासनाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## कोथरूडमध्ये पूर्ववैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार

**तरुण गंभीर जखमी**

पुणे (दै. संध्या)

पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर कोयत्याने वार केल्याची घटना कोथरूडमधील केळेवाडी परिसरात घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, कोथरूड पोलिसांनी चौघांसह त्यांच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. आदित्य ऊर्फ सनी राजू गाडे (वय-२१, रा. केळेवाडी, कोथरूड) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी एका महिलेने (वय १९) कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी राहुलसिंग टाक, अनिलसिंग टाक, पिंटूसिंग दुधाणी, सुखासिंग दुधाणी आणि त्यांच्या इतर साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या नात्यातील एका तरुणीला आरोपी राहुलसिंग टाक याने काही दिवसांपूर्वी पळवून नेले होते. या प्रकारामुळे गाडे आणि टाक कुटुंबीयांमध्ये वाद झाला होता. याच रागातून काही दिवसांपूर्वी सांगली जिल्ह्यातील आष्टा परिसरात आदित्य आणि त्याच्या साथीदारांनी राहुलसिंग याच्यावर शस्त्राने वार केले होते. याच जुन्या वादातून आरोपी राहुलसिंग आणि त्याच्या साथीदारांनी आदित्यवर पाळत ठेवली होती. तीन मे रोजी रात्री आदित्य हा केळेवाडी परिसरातून जात असताना आरोपींनी त्याला रस्त्यात अडवले. आरोपींनी त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कोयत्याने त्याच्यावर वार केले. या हल्ल्यात आदित्य गंभीर जखमी झाला आहे.

## पुणे जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे

**शेरसिंग रुक्कानसिंग डागोर**

पुणे (दै. संध्या)



सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे पुणे जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे , या मॉडेलची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे २२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरांचे आयोजन करावे. शिबीरे आयोजित करतांना सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांसोबत सोबत घ्यावे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित प्रश्न मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. डागोर यांनी दिल्या.

श्री. डुडी म्हणाले, सफाई कर्मचारी आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही श्री. डुडी म्हणाले.

# हसन मुश्रीफ यांच्या हस्ते अत्याधुनिक प्री-क्लिनिकल डेंटल लॅबचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)




एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर, पुणे हे आपले २५ वे वर्ष साजरे करत असताना, आधुनिक दंत शिक्षणाच्या दिशेने कॉलेज आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत आहे. महाराष्ट्र सरकारचे वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि एम.यू.एच.एस., नाशिकचे प्र-कुलगुरू माननीय श्री. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते कॉलेजच्या अत्याधुनिक प्री-क्लिनिकल प्रोस्थोडॉन्टिक्स आणि प्री-क्लिनिकल कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री प्रयोगशाळांचे उद्घाटन ७ मे २०२६ रोजी आझम कॅम्पस, पुणे येथे होणार आहे.

हे उद्घाटन कॉलेजच्या २० व्या पदवीदान समारंभाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. नवीन प्री-क्लिनिकल प्रयोगशाळा दंतवैद्यकीय विद्यार्थ्यांना रुग्णांवर उपचार सुरू करण्यापूर्वी प्रत्यक्ष सरावाचा अनुभव मिळावा या उद्देशाने तयार करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळेत १०० पूर्णपणे सुसज्ज फॅन्टम हेड वर्कस्टेशन्स आहेत. प्रत्येक वर्कस्टेशनमुळे विद्यार्थी प्रत्यक्ष क्लिनिकल कामासारख्या वातावरणात दंत उपचारांचा सराव करू शकतील.

या प्रयोगशाळेत आधुनिक एलईडी प्रकाशव्यवस्था, हाय-स्पीड डेंटल उपकरणे, कॅमेऱ्याच्या मदतीने अध्यापन आणि थेट प्रात्यक्षिकांसाठी मोठे स्क्रीन उपलब्ध आहेत. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना प्रक्रिया पाहणे, समजून घेणे, सराव करणे आणि पुन्हा पुन्हा शिकणे अधिक सोपे होणार आहे.

एम.सी.ई. सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती अबेदा पी. इनामदार म्हणाल्या, "ही प्रयोगशाळा आमच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि रुग्णांच्या सन्मानासाठी केलेली गुंतवणूक आहे. विद्यार्थी रुग्णसेवेत जाण्यापूर्वी चांगले शिकले, तर ते अधिक आत्मविश्वासू, काळजीपूर्वक आणि संवेदनशील डॉक्टर बनतात. आमचा उद्देश समाजाची कौशल्याने आणि संवेदनशीलतेने सेवा करणारे तरुण दंतवैद्य तयार करणे हा आहे."

प्रोस्थोडॉन्टिक्स, क्राउन अँड ब्रिज विभागाचे अधिष्ठाता, प्राध्यापक आणि विभागप्रमुख डॉ. रामनदीप दुगल म्हणाले, "आधुनिक दंत शिक्षणाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांसाठी नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवसायासाठीही तयार केले पाहिजे. ही प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून सराव करण्याची संधी देते. त्यामुळे त्यांना रुग्णांचा आराम, उपचार पद्धती आणि क्लिनिकल काम यांची चांगली समज मिळेल. क्लिनिकल वर्षांत जाण्यापूर्वी ते अधिक तयार होतील आणि रुग्णसेवा अधिक आत्मविश्वासाने व काळजीपूर्वक करू शकतील."

कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री आणि एंडोडॉन्टिक्स विभागाचे उपप्राचार्य, प्राध्यापक आणि विभागप्रमुख डॉ. विवेक हेगडे म्हणाले, "या प्रयोगशाळेची खरी ताकद म्हणजे विद्यार्थी महत्त्वाची क्लिनिकल कौशल्ये नियोजनबद्ध पद्धतीने शिकू शकतात. ते फॅन्टम हेडवर सराव करून बसण्याची योग्य पद्धत, हाताची हालचाल, उपकरणांवरील नियंत्रण आणि कॅव्हिटी तयारी यासारख्या गोष्टी रुग्णांवर काम करण्यापूर्वी शिकू शकतात. शिक्षकांची प्रात्यक्षिके मोठ्या स्क्रीनवर दाखवता येणार असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला प्रक्रिया स्पष्टपणे पाहता येईल." या नवीन प्रयोगशाळा कॉलेजच्या डिजिटल डेंटिस्ट्रीच्या भविष्यातील योजनांनाही मदत करतील. यामध्ये प्रगत सिम्युलेशन, डिजिटल मॉडेलिंग, ३डी-प्रिंटेड प्रशिक्षण मॉडेल्स आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक प्रमाणबद्ध शिक्षण यांचा समावेश आहे. कॉलेजच्या मते, ही नवीन सुविधा विद्यार्थ्यांची तयारी, रुग्णांची सुरक्षितता आणि भविष्याभिमुख दंत शिक्षण यावर कॉलेजचा असलेला भर स्पष्ट करते

# बहुचर्चित म्हातोबा आळंदीच्या पुलाचे काम लवकरच सुरू होणार



**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

आळंदी म्हातोबा परिसरातील तसेच शेजारील गावांसाठी जीवनवाहिनी मानला जाणारा आणि कुंजीरवाडी येथील नव्या उजव्या कालव्यावर उभारला जाणारा महत्त्वाचा व बहुचर्चित पूलाचे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती उपअभियंता मुठा कालवे पाटबंधारे उपविभाग मोहन बधाने यांनी दिली .

गेली अनेक वर्षे या पुलाचे काम रखडले होते .२०१४ साली अवघ्या ३३.५२ लाख रुपयांची मंजुरी मिळालेल्या या पुलाचा खर्च आज तब्बल ८० लाखांच्या पुढे पोहोचला आहे . प्रत्यक्षात एकही काम सुरू झालेले नसताना केवळ पुलाच्या खर्चाची आकडेवारी मात्र वाढत चालली होती .त्यामुळे पंचक्रोशीत ही बाबच आश्चर्यकारक ठरत आहे. तीन वेळा खर्चवाढ, निविदा प्रक्रिया पूर्ण आणि सर्व प्रशासकीय मंजुरी असूनही कामाचा ठावठिकाणा नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत होती .प्रशासनाकडून या पुलाच्या कामाला हिरवा कंदील मिळाला असला तरी “कालव्याचे आवर्तन थांबल्यानंतर जून महिन्यात काम सुरू केले जाईल” असे सांगितले जात आहे .तरी नागरिकांना अजुन विश्वास बसत नाही . कारण काम सुरूच झालेले नसताना निधी वारंवार कसा वाढवला जातो, कोणती कारणे दाखवून ३३ लाखांचा खर्च थेट ८० लाखांवर नेण्यात आला, याचे स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने संशय अधिकच गडद होत आहे. पुलाला सुद्धा महागाईची झळ बसली का असा उपरोधिक प्रश्न नागरिकांनी केला आहे .

दरम्यान, या प्रकल्पामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याची चर्चा गावात सुरू आहे .पाणी थांबण्याची वाट पाहताना निधी मात्र का वाढतो?” हा सवाल आता गावागावात चर्चेचा विषय ठरत आहे. पुलाची सध्याची अवस्था अत्यंत धोकादायक बनली असून हा मार्ग केवळ स्थानिक गावांना जोडणारा नसून महामार्गाकडे जाणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. रोज हजारो नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थी या मार्गाने जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. अनेक अपघात होऊनही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. फाईली पुढे सरकत राहतात, मंजुरी वाढत राहते, निधी वाढत राहतो; मात्र प्रत्यक्षात काम शून्यच — अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. “पूल बांधणार की फक्त कागदावरच दाखवणार?” आणि “जूनची तारीख अंतिम की आणखी एक आश्वासन?” असे रोखठोक सवाल आता खुलेआम विचारले जात आहेत. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष जून महिन्याकडे लागले असून, खरोखरच काम सुरू होते की पुन्हा एकदा कारणांची नवी मालिका पुढे येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

> पुलाचे काम आवर्तन थांबल्यावर होणार असुन पुल तयार झाल्यावर म्हातोबाची आळंदीच्या विकासात आणखीच भर पडणार आहे. दळणवळण सुविधा आणखी जलद गतीने होईल. शासकीय पातळीवरुन पुलाच्या कामाला परवानगी मिळाली असुन लवकरच काम सुरू होईल.
> **- दिलीप वाल्हेकर**
> **अध्यक्ष हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट)**

## श्री क्षेत्र थेऊर येथे पहाटे पासुन भाविकांची श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी गर्दी

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**



आज वैशाख महिन्यातील अंगारक संकष्ट चतुर्थी असल्याने भाविकांनी श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटे पासून गर्दी केली होती. पहाटे पुजारी कीर्तिराज आगलावे यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली. देवस्थान तर्फे गणेश याग करण्यात आला. यावेळी विश्वस्त केशव उमेश विद्वांस, विश्वस्त विक्रम दौंडकर उपस्थित होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगण आणि मंदिराबाहेर मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. उन्हामुळे भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून जागोजागी कुलर लावण्यात आले होते दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ. प. सर्जेराव महाराज काशिद , मजलगाव यांचे सुभाष्य कीर्तन झाले, चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली देवस्थानचे विश्वस्त केशव उमेश विद्वांस व विक्रम बाळासाहेब दौंडकर लक्ष ठेवून होते.

## नागराज मंजूळेंसह जिओला नोटीस

पुणे (दै. संध्या) : न्यायालयात दावा सुरू असतानाही ‘खाशाबा’ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केल्याने चित्रपट स्थगितीच्या सुनावणीबाबत दिग्दर्शक नागराज मंजूळे यांच्यासह निर्मात्या ज्योती देशपांडे, जिओ स्टुडियो, आटपाट प्रोडक्शनला पुणे सत्र न्यायालयाने नोटीस बजावली आहे. याबाबत आठ मेपर्यंत आपले म्हणणे मांडावे, असे न्यायालयाने दिलेल्या आदेशात नमूद आहे. डिसेंबर २०२४ दरम्यान मंजुळे यांनी घोषित केलेल्या खाशाबा जाधव यांच्या चित्रपटातील कथेबाबत मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांनी कॉफीराईटचा दावा येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केला आहे. खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क २००१ पासून आपल्याकडे असून भारत सरकारच्या कॉपीराइट कार्यालयाचे प्रमाणपत्रही आहे, असे दुधाणे यांच्या याचिकेत नमूद आहे.

## स्टेनली जॉर्डन आणि केनवुड डेनार्ड यांचे लाईव्ह परफॉर्मन्स

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

विंडमिल्स क्राफ्टवर्क्सतर्फे बेंगळुरू आणि हैदराबादमध्ये प्रसिद्ध गिटारवादक स्टेनली जॉर्डन यांचे स्वागत; त्यांच्या अनोख्या गिटार वाजवण्याच्या शैलीने संगीताला नवा आयाम दिला आहे. त्यांच्यासोबत प्रसिद्ध ड्रमर केनवुड डेनार्ड देखील लाईव्ह परफॉर्मन्स सादर करणार आहेत.

भारतामधील खास अनुभव देणाऱ्या ठिकाणांपैकी एक असलेले विंडमिल्स क्राफ्टवर्क्स हे संगीत, आंतरराष्ट्रीय खाद्यसंस्कृती, क्राफ्ट बिअर आणि सुंदर आर्किटेक्चर यांचा संगम घडवून अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी ओळखले जाते. या मे महिन्यात, टोटल एन्व्हायर्नमेंट म्युझिक फाउंडेशनतर्फे चार वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवलेले जॅझ गिटार वादक स्टेनली जॉर्डन यांचा खास लाइव्ह परफॉर्मन्स आयोजित करण्यात आला आहे.



त्यांच्यासोबत प्रसिद्ध दमदार ड्रमर केनवुड डेनार्ड देखील असतील. हा कार्यक्रम 15 मे 2026 रोजी विंडमिल्स क्राफ्टवर्क्स, हैदराबाद येथे होईल. त्यानंतर 16 आणि 17 मे 2026 रोजी बेंगळुरूमध्येही हा कार्यक्रम सादर केला जाईल.

संगीतप्रेमींना या कार्यक्रमात सुंदर ताल, सहज सादरीकरण (इम्प्रोव्हायझेशन), जॅझ संगीताचा आनंद घेता येईल. दोन दिग्गज संगीतकारांमधील सुरेल संवादही अनुभवायला मिळेल. हा कार्यक्रम खास ऐकण्यासाठी तयार केलेल्या वातावरणात आयोजित करण्यात आला आहे.

स्टेनली जॉर्डन यांनी त्यांच्या दोन हातांनी वाजवण्याच्या ‘टच टेक्निक’ या अनोख्या शैलीमुळे जॅझ संगीताला नवीन ओळख दिली आहे. ते एक प्रतिभावान कलाकार असून, या टेक्निकच्या मदतीने ते एकाच वेळी सूर, ताल आणि हार्मनी सादर करतात. त्यामुळे त्यांनी जगभरात मोठी ओळख आणि चाहतावर्ग निर्माण केला आहे. डिझी गिलेस्पी, क्विन्सी जोन्स यांसारख्या प्रसिद्ध कलाकारांसोबत केलेल्या कामामुळे त्यांची संगीत कारकीर्द अधिक मजबूत झाली आहे. त्यांच्या सोबत केनवुड डेनार्ड हेही दमदार कलाकार असतील. ते लाईव्ह परफॉर्मन्समध्ये ड्रम्ससोबतच कीबोर्डही दोन्ही वाजवणार आहेत.

## या उन्हाळ्यात प्रोटीनयुक्त आहार खा



**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

उन्हाळा लवकरच आला आहे, आणि किनाऱ्यावर जाण्याचे ट्रिप्स डोळ्यासमोर आहेत, आता तुमच्या फिटनेस रूटीनला सुरू करण्यासाठी योग्य वेळ आहे. जिम सेशन्स महत्त्वाचे असले तरी, आहार निरोगी शरीराचे वजन स्कल्प्ट आणि मेंटेन करण्यात तितकाच महत्त्वाचा भूमिका बजावतो. रितिका समद्दार, येथील प्रादेशिक प्रमुख डायटेटिक्स मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली यांचा सल्ला असा आहे की कॅलिफोर्निया ॲल्मंड्स, ग्रीक दही आणि सॅल्मन यांचा समावेश असलेली ही सोपी, प्रोटीन-युक्त योजना उपयुक्त ठरते.

दिवसाची सुरुवात करा काही कॅलिफोर्निया ॲल्मंड्स घेऊन. प्रोटीन, आरोग्यदायी फॅट्स, व्हिटॅमिन ई आणि मॅग्नेशियमने भरलेले हे ॲल्मंड्स तुम्हाला ऊर्जेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात, अचानक उर्जा वाढीशिवाय. कोणत्याही फिटनेस-केंद्रित आहारासाठी हे उत्कृष्ट आहेत.

त्यांना दोन उकडलेली अंडी जोडा, जेणेकरून तुम्हाला संपूर्ण प्रोटीन मिळेल. ही कॉम्बिनेशन हलकी, पोर्टेबल आणि व्यस्त सकाळीसाठी परिपूर्ण आहे.

मिक्स्ड ग्रीन्स, चेरी टोमॅटो आणि काकडीसह ग्रिल्ड चिकन ब्रेस्ट निवडा. हे जेवण लीन प्रोटीन, फायबर आणि भाज्यांमधून हायड्रेशन प्रदान करते, ज्यामुळे तुम्ही हलके पण दुपारी तरी संतुष्ट राहता.

दुपारच्या शेवटी ऊर्जेसाठी ग्रीक दही घ्या, त्यावर एका चमच्याप्रमाणे चिया बियांचा थर लावा. हा स्नॅक पचनतंत्रासाठी प्रोबायोटिक्स, टिकाऊ ऊर्जा आणि थंड करणारा, ताजेतवाने अनुभव प्रदान करतो.

दिवसाची समाप्ती करा बेक्ड सॅल्मन फिलेट्ससह, ज्यासोबत शिजवलेली क्विनोआ आणि स्टीम केलेली ब्रॉकली सर्व्ह करा. हा पौष्टिक डिश त्वचेसाठी ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, अँटी-इंफ्लेमेटरी फायदे आणि संपूर्ण प्रोटीन प्रदान करतो, जे रात्रीच्या स्नायू दुरुस्तीसाठी उपयुक्त आहे.

हा सोपा दिनचर्या स्नायू वाढीस मदत करणे, भूक नियंत्रित करणे आणि वजन व्यवस्थापनास सहाय्य करणे यावर भर देतो. दुपारी जड कार्बोहायड्रेट टाळा कारण ते पचवायला अवघड असतात. प्रमाणित आहार, चांगले हायड्रेशन आणि हलकी व्यायाम यावर लक्ष केंद्रित करा. हे सोपे, व्यावहारिक टिप्स तुम्हाला उन्हाळ्याच्या उष्णतेत तंदुरुस्त आणि ऊर्जावान राहण्यासाठी मदत करू शकतात.

## *नराधमाला फाशी द्या : चिमुकलीला श्रद्धांजली*

# सासवडमध्ये जनसमुदायाचा संताप




**सासवड (दै. संध्या) :**

भोर तालुक्यातील नसरापूर येथे महाराष्ट्र दिनी एका साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या अमानवी कृत्याचा निषेध करण्यासाठी मंगळवारी (दि. ५) सासवड (ता. पुरंदर) येथील शिवतीर्थावर समस्त नागरिकांच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला. भरलेल्या डोळ्यांनी आणि संतापलेल्या स्वरात सासवडकरांनी एकाच मागणीचा नारा दिला— "त्या नराधमाला फाशीच झाली पाहिजे!"

स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या पुढाकाराने या निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून झाली. साडेतीन वर्षांच्या त्या निष्पाप कळीचा ज्या क्रूरपणे अंत झाला, त्याबद्दल उपस्थित नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. "ही घटना शिवरायांच्या महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे, अशा विकृतांना कायद्याचा धाक बसण्यासाठी खटला जलदगतीने चालवून फाशी द्यावी," अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठी उपस्थिती दर्शवली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, भाजपा शहराध्यक्ष आनंद जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे, हेमंत ताकवले, अंकुर शिवरकर, हरून बागवान, आरीफ आतार यांच्यासह धनश्री लोमटे, नाना जगताप, कॅप्टन किरण पुरंदरे, अमित पवार, सुनील जगताप, स्वानंद लोमटे, हर्षदा शेंडकर, प्राची सपकाळ आणि ज्ञानेश्वरी आखाडे उपस्थित होते.

तसेच शहरातील पुरंदर करीअर ॲकॅडमी, चॅम्पियन मार्शल आर्ट अँड स्पोर्ट्स ॲकॅडमी, शहर पत्रकार संघ, मुस्लिम संघटना, माजी सैनिक प्रतिष्ठान, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, कलासिद्धी नृत्यालय आणि जिजामाता फळ भाजीपाला विक्रेते संघटना अशा अनेक संस्थांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सामील झाले होते.

आंदोलनानंतर नागरिकांच्या वतीने लहानग्या मुक्ता शिवरकर हिच्या हस्ते पोलीस उपनिरीक्षक अशोक जाधव यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

**तमाम नागरीकांस विशेषतः गाव मौजे ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सर्व नागरीकांना सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

आमचे आशिल यांनी खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतींसंदर्भात श्री. बवन विठ्ठल मांडे, ओझर, ता. जुन्नर जि. पुणे यांचेबरोबर व्यवहार केला असुन सदरच्या मिळकती आमचे अशिलांना विकत घ्यावयाच्या आहेत. खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती श्री. बबन विठ्ठल मांडे, ओझर, ता. जुन्नर जि. पुणे यांच्या मालकीच्या असुन, त्यांनी ते खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतींचे कायदेशीर मालक असल्याची माहीती व सदरील मिळकती त्यांचे प्रत्यक्ष ताबेवहीवाटीत असल्याची माहीती आमचे अशिलांना दिली आहे. आमचे अशिल त्यांचेबरोबर सदर मिळकतींचा व्यवहार पुर्ण करु इच्छित आहेत. इतर कोणाची फसवणुक होऊ नये म्हणुन आमचे अशिल सदरची जाहीर नोटीस मुद्दामहून प्रसिध्द करीत आहेत.

खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतींसंदर्भात कोणताही करार, साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, भाडेकरार, मुखत्यारपत्र, कुलमुखत्यारपत्र वगैरे तत्सम स्वरुपाचा कोणताही तबदीलीचा व्यवहार श्री. बबन विठ्ठल मांडे, ओझर, ता. जुन्नर जि. पुणे यांचेबरोबर यापूर्वी कोणी केलेला असल्यास तसेच कोणाचाही सदर मिळकतींमध्ये हक्क हितसंबंध असल्यास लेखी कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ५ दिवसाचे आत खालील नमुद केलेल्या पत्यावर संपर्क साधुन कागदपत्रांनिशी खात्री पटवुन दयावी. सदरील वर नमुद केलेल्या मुदतीत खाली नमुद केलेल्या मिळकतीं संदर्भात कोणीही खात्री पटवुन दिली नाही अगर हरकत

घेतली नाही तर आमचे अशिल श्री. बबन विठ्ठल मांडे, ओझर, ता. जुन्नर जि. पुणे यांचेबरोबर व्यवहार पुर्ण करतील मग मात्र कोणाचीही कोणतीही बाब ऐकुन घेतली जाणार नाही किंवा कोणाचाही काही हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :- अ) तु. पुणे पो.तु.ता. जुन्नर, मे. सब रजि. सो. जुन्नर यांचे हद्दीतील गांव मौजे ओतुर येथील बिनशेतजमीन

| अ.क्र. | ग.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १) | १७३/१/२ | ०.०६ | ६०.०० |

यापैकी दक्षिणेकडुन ०.०५.४० आर क्षेत्र.

| अ.क्र. | ग.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २) | १७४/५ | ०.१३ | १३०.०० |

यापैकी दक्षिणेकडुन ०.०५.६० आर क्षेत्र.

येणेप्रमाणे वर्णनाची बिनशेती जमीन त्यातील अंगभुत वस्तुसुध्दा सर्व हक्कासह व रस्त्यासह सर्व इजमेंटरी राईटसह दरोबस्त मिळकत.

दि. ०५/०५/२०२६ येणेप्रमाणे जाहिर नोटीस

शिक्का

**ॲड. प्रफुल्ल रा. लुंकड**
**बी.कॉम., एल.एल.बी. महा./१२४/१९९६**
**रा. "प्रफुल्ल", ७७ सराईपेठ,**
**जुन्नर, जि. पुणे. मोबा. ९८८१६६६९९० / ७५८८१८३६६६**



### ग्रामपंचायत कुरूंजी, ता. भोर जि. पुणे

**जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस**

ग्रा.पं.कुरूंजी, ता.भोर, जि.पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.कुरूंजी येथे अनु.जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत काम मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि. ०६.०५.२०२६ ते दि. १२.०५.२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अं.प. रक्कम / साहीत्य रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी.सहीत) | बयाना रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुरूंजी पंचशील नगर येथे सिमेंट रस्ता करणे. | अनु.जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे. | ४,९९,८९५ | २३६ | ५००० | ६ महीने |

अटी व शर्ती - १) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. कुरूंजी कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. २) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. १३.०५.२०२६ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता ग्रा.पं. कुरूंजी येथे पार पडेल. ३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी. प्रमाणपत्र झेरॉक्स व निविदा तसेच बयाणा रकमेचा डी.डी/धनादेश सरपंच, ग्रा.पं.कुरूंजी यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत. ४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील. ५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल. ६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग भोर यांचे राहिल. ७) साहीत्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल. ८) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.कुरूंजीयांनी राखून ठेवला आहे. ९) अ.क्र.१ मधील नमूद कामाचे ९०% देयक जमा असल्याने काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत १०% रक्कम प्रस्तावाअंती नियमानुसार जमा झाल्यानंतरच अदा केली येईल.याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी /-
ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत कुरूंजी, ता. भोर जि. पुणे



### ग्रामपंचायत उंब्रज नं. १ ता. जुन्नर, जि. पुणे

**जाहीर निविदा अंतर्गत खुली निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२७**

सरपंच,ग्रामपंचायत उंब्रज नं. १ ता.जुन्नर,जि.पुणे हे योग्य वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी रक्कम रू. | इसारा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा प्रसिध्द दिनांक | स्विकारणेचा अंतिम दिनांक | कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत उंब्रज नं. १ ता. जुन्नर, जि.पुणे येथे आर.ओ.बसविणे. | ३,००,००० | ५०० | सुट | ६ महिने | ०५/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | १२/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | सु. बे. |

टीप : वरील कामाची सविस्तर निविदा पत्रके ग्रामपंचायते नोटीस बोर्ड/ग्रामपंचायत कार्यालय याठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.सदर कामाबाबत निविदा, अटी व शर्ती ई. बाबचा सर्व तपशिल ग्रामपंचायत कार्यालय उंब्रज नं. १ येथे पहावयास मिळेल.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत उंब्रज नं. १ ता. जुन्नर, जि. पुणे
सही/- सरपंच, ग्रामपंचायत उंब्रज नं. १ ता. जुन्नर, जि. पुणे



### सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : २३.०३.२०२६**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६**

**शासन सूचना क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/भारत मंडपम/कन्व्हेशन सेंटर/सूचना/नवि-१३:-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/ वियो. व प्रायो./कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/ नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३, दि.२०.०३.२०२५ अन्वये भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सात महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये **भारत मंडपम या नामाभिधानाने** किमान ३० एकर क्षेत्राखालील जागा आरक्षित ठेवण्याकरिता उक्त अधिनियमान्वये कलम ३७ (१) अन्वयेचा परिपूर्ण फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वयेचे निदेश पारित केले आहेत (यापुढे "उक्त निदेश" असे संबोधिले आहे):

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.२०.०३.२०२५ रोजी पारित केलेल्या उक्त निदेशानुसार भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास योजनेमधील "भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर" या नामाभिधानाचे आरक्षणाचे सुयोग्य विकसनाच्या दृष्टीने उक्त नियमावलीच्या विनियम क्र.११.१ (Table No.11-A) मध्ये नवीन तरतुद क्रमांक 8 (A) व त्यासह विनियम क्र. ४.२७.५ (y) या दोन तरतुदी नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) व कलम २० (३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती. ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात येत आहे);

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती /छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण.
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

शिक्का

**सही/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**विमाका/पुणे/जाहि./२८/२०२६-२७**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी आमदार सुनील शेळके यांची ठाम भूमिका

वडगाव मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या 'शेत पाणंद रस्ते' प्रश्नावर आमदार सुनील शेळके यांनी ठाम भूमिका घेत निर्णायक पावले उचलली आहेत. वडगाव मावळ येथे आयोजित आढावा बैठकीत त्यांनी तालुक्यातील विविध गावांतील पाणंद रस्त्यांची स्थिती, अतिक्रमण आणि नागरिकांच्या तक्रारी यांचा सविस्तर आढावा घेतला. अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे बंद पडलेले रस्ते तात्काळ खुले करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. या बैठकीत मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. पाणंद रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे शेतीकामात मोठ्या अडचणी येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावर आमदार शेळके यांनी तत्काळ अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रत्यक्ष जागेवर तोडगा काढण्यावर भर दिला. "नुसती चर्चा नाही, तर प्रत्यक्ष कृती" हा मंत्र त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केला. या बैठकीस उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, भूमी अभिलेख उपअधीक्षक नितीन सूर्यवंशी यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते. यावेळी घरकुल योजनेचाही आढावा घेण्यात आला असून, संबंधित समस्यांवरही त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आक्रमक आणि कृतीशील भूमिका घेत, मावळ तालुक्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आमदार सुनील शेळके सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### चिंचवड येथील एम्पायर इस्टेट ब्रिजवर भीषण अपघात; तरुणाचा जागीच मृत्यू

पिंपरी (दैनिक संध्या) : चिंचवड येथील एम्पायर इस्टेट ब्रिजवर मंगळवारी (दि.०५) पहाटेच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने दुभाजकाला (डिवायडर) धडक दिली. या अपघातात एका तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. आदित्य बसलिंगप्पा मिटी (वय २९, रा. हडपसर, पुणे) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दुचाकी स्वार तरुणाचे नाव आहे. आदित्य हा मंगळवारी (दि. ५ मे) रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास एम्पायर इस्टेट ब्रिजवरून आपल्या दुचाकीवरून जात होता. यावेळी दुचाकीचा वेग प्रचंड असल्याने एम्पायर इस्टेट वसाहतीजवळ आदित्यचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी थेट दुभाजकाला जाऊन धडकली. धडक इतकी जोरात होती की आदित्य गंभीररीत्या जखमी झाला आणि मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर पुलावर रक्ताचा सडा पडला होता. पहाटेच्या वेळी रक्तामुळे रस्ता निसरडा होऊन इतर वाहनांना धोका निर्माण होऊ नये, यासाठी तातडीने अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. जवानांनी पाण्याचा मारा करून रस्ता पूर्णपणे धुवून स्वच्छ केला. घटनेची माहिती मिळताच चिंचवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आदित्यचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, याप्रकरणी पुढील तपास चिंचवड पोलीस करत आहेत. भरधाव वेग पुन्हा एकदा एका निष्पाप जीवाच्या जीवावर बेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### भाडेकरूंची माहिती लपविणे भोवले; पिंपरी-चिंचवडमध्ये 38 घरमालकांवर गुन्हे दाखल




पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक असतानाही या नियमाकडे दुर्लक्ष करणाऱ्या ३८ घरमालकांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. एप्रिल २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ही कारवाई करण्यात आली. शहरात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या व्यक्तींचा, विशेषतः संशयित बांगलादेशी नागरिकांचा शोध घेणे तसेच सुरक्षेला बाधा पोहोचवणारे प्रकार रोखणे, या उद्देशाने दहशतवाद विरोधी शाखा (ATB) आणि स्थानिक तपास पथकांनी (ATC) संयुक्तपणे भाडेकरू पडताळणी मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान अनेक घरमालकांनी भाडेकरूंची माहिती पोलिसांना न दिल्याचे उघड झाले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ नुसार घरमालकांनी भाडेकरूंची संपूर्ण माहिती संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित घरमालकांवर भारतीय न्याय संहिता-२०२३ च्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, घरमालकांनी आपल्या भाडेकरूंची आवश्यक कागदपत्रे जवळच्या पोलीस ठाण्यात जमा करून पडताळणी करून घ्यावी. तसेच परिसरात कोणतीही संशयास्पद व्यक्ती अथवा हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी. माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील अनियमितता; 10 कर्मचाऱ्यांना नोटीस

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात अनामत रक्कम आणि भाडे वसुलीत अनियमितता झाल्याचे प्रकरण पुढे आले. अखेर या प्रकरणात लिपिक पदाच्या एकूण 10 कर्मचाऱ्यांना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांच्यावर आर्थिक नुकसान केल्याचा ठपका ठेवत 50 लाख 71 हजार रुपये दहा दिवसांच्या आत जमा करण्यास बजावण्यात आले आहे. प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात सन 2018 ते 2024 या कालावधीत क्रीडा विभागाकडून लिपिक व मुख्य लिपिक कार्यरत होते. तसेच, व्यवस्थापक म्हणून नाट्यगृहाची जबाबदारी काही कर्मचाऱ्यांवर देण्यात आली होती. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात झालेले कार्यक्रम व रक्कम किती जमा झाली आहे, याचा हिशेब ठेवला नाही. हा प्रकार तब्बल सहा वर्षे सुरू होता. काही कर्मचाऱ्यांनी ही रक्कम महापालिकेत जमा न करता थेट स्वतःच्या खिशात घातली. हा प्रकार समोर आल्यानंतर क्रीडा विभागाने संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू केली. रजिस्टर तपासणीत झालेले कार्यक्रम आणि प्रत्यक्षात जमा झालेली रक्कम यात तफावत आढळून आली. नंतर अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये (ऑडिट) संबंधित कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या भाड्यापोटी जमा झालेले लाखो रुपये तिजोरीत भरली नसल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, नाट्यगृह भाड्याने देताना अनामत रक्कमा न घेणे, भाडे वसुलीची परस्पर विल्हेवाट लावणे, इतर साहित्य, साधनसामुग्रीचे आर्थिक नुकसान झाल्याचा ठपका कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आला.

# "FIR शिवाय चौकशी म्हणजे केवळ दिखावा"

**दक्ष नागरिक संघाची महापालिकेतील ₹६० कोटींच्या कथित घोटाळ्यावर तीव्र भूमिका**

> दक्ष नागरिक संघाने या प्रकरणात तातडीने FIR नोंद करून स्वतंत्र व निष्पक्ष तपास करण्याची मागणी केली आहे. यासाठी जर या कालावधीत FIR नोंद करण्यात आली नाही, तर ॲड. अजित बोराडे हे स्वतः न्यायालयात खासगी फौजदारी तक्रार दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई करतील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.
> **- ॲड. अजित बोराडे, अध्यक्ष, दक्ष नागरिक संघ, महाराष्ट्र राज्य**

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सुमारे ₹६० कोटींच्या कथित आर्थिक घोटाळ्याबाबत गंभीर दखल घेत महानगरपालिका आयुक्त यांनी तात्काळ गुन्हा (FIR) नोंद करून संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि इतर जबाबदार व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी दक्ष नागरिक संघाचे अध्यक्ष ॲड. अजित बोराडे यांनी केली आहे. पिंपरी येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

दक्ष नागरिक संघाचे अध्यक्ष ॲड. अजित बोराडे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सुमारे ₹६० कोटींच्या कथित आर्थिक घोटाळ्याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली असून महापालिका आयुक्तांना नोटिस दिलेली असून केवळ अंतर्गत चौकशी पुरेशी नसून तात्काळ गुन्हा (FIR) नोंद करण्याची मागणी केली आहे. महानगरपालिका प्रशासनाला ७ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

स्थायी समिती व महासभेत बनावट ठराव मंजूर करून त्याच्या आधारे कोट्यवधी रुपयांची बिले मंजूर करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. प्राथमिक चौकशी अहवालामध्ये अशा किमान १४ बनावट ठरावांची नोंद झाल्याचे समोर आले आहे.

ॲड. बोराडे यांनी स्पष्ट केले की, FIR नोंद झाल्याशिवाय पोलीस यंत्रणा कार्यान्वित होत नाही, परिणामी पंचनामा, कागदपत्रांची तसेच फॉरेन्सिक तपास यांसारख्या अत्यावश्यक प्रक्रिया होऊ शकत नाहीत. त्यामुळे केवळ "अंतर्गत चौकशी" हा प्रकार केवळ वेळकाढूपणा असून जनतेची दिशाभूल करणारा आहे.

ॲड. बोराडे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, एकीकडे महानगरपालिका व राज्य शासन नागरिकांसाठी आवश्यक सुविधा जसे की रस्ते, पदपथ, पाणीपुरवठा यासाठी निधीची कमतरता असल्याचे सांगतात, तर दुसरीकडे अशा प्रकारचा ₹६० कोटींचा कथित अपहार अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या पैशांचा गैरवापर आहे.

त्यांनी पुढे प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा या प्रकरणात करदात्यांच्या पैशांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचा आरोप असताना व महापालिकेचे स्वत:चेच कर्मचारी यामध्ये सहभागी असल्याचा आरोप होत असताना महानगरपालिका स्वतःची चौकशी स्वतःच कशी करू शकते व अशा चौकशीला निष्पक्ष व कायदेशीर कसे म्हणता येईल? FIR दाखल करण्यात होणारा विलंब हा पुरावे नष्ट करण्यास व आरोपींना वेळ देण्यास कारणीभूत ठरू शकतो, जे अत्यंत गंभीर आहे.

# हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नका - आमदार जगताप

**धर्मांतराच्या षडयंत्राविरोधात काळेवाडीत 'आक्रोश' मोर्चा : दोषींवर कठोर कारवाईसाठी जनसमुदाय रस्त्यावर**




पिंपरी (दै. संध्या)

आमिषे दाखवून आणि अंधश्रद्धेचा प्रसार करून हिंदूंचे बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात रविवारी काळेवाडीत 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. 'काळेवाडी कन्वर्जन फाईल्स' मधील सत्य समोर आणून दोषींना शिक्षा व्हावी, या मागणीसाठी हजारो हिंदू बांधव आणि महिला या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. "प्रशासनाने हिंदूंच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा पुढच्या परिणामांना सरकार जबाबदार असेल," असा इशारा आमदार शंकर जगताप यांनी यावेळी दिला.

काळेवाडीतील पंचनाथ चौक ते आबाजी नाणेकर चौक दरम्यान हा मोर्चा काढण्यात आला. या आक्रोश मोर्चात आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उमा खापरे, ॲड. वर्षाताई डहाळे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक विनोद नढे, नगरसेविका नीता पाडाळे, कोमल काळे, सरचिटणीस वैशाली खाडये, चिंचवड-काळेवाडी मंडळ अध्यक्ष ॲड. हर्षद नढे, सामाजिक कार्यकर्ते काळूराम नढे तसेच विविध हिंदू सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्चाला संबोधित करताना आमदार जगताप म्हणाले की, "विज्ञानाच्या युगात प्रार्थना करून आजार बरे करण्याचे दावे करणे ही शुद्ध फसवणूक आहे. जर असे असते तर रुग्णालयांची गरजच उरली नसती. गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन चाललेला हा धर्मांतराचा बाजार आम्ही पिंपरी-चिंचवडमध्ये चालू देणार नाही. महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून आरोपींना १० लाखांपर्यंत दंड आणि कठोर शिक्षा झालीच पाहिजे."

यावेळी आमदार जगताप यांनी नागरिकांना आवाहन केले की, "आपल्या शेजारी काय घडतेय याकडे डोळेझाक करू नका. असे संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ प्रशासनाला किंवा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना कळवा," असे आवाहन जगताप यांनी केले. तसेच, विधिमंडळात यावर चर्चा झाली असून मंत्र्यांनीही कारवाईचे निर्देश दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोपीचंद पडळकर म्हणाले, "महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायद्याच्या माध्यमातून अशा प्रकारांना लगाम घालण्याची तरतूद करण्यात आली असली, तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक आहे. केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रशासनाने अशा प्रवृत्तींच्या मुळाशी जाऊन त्यांना ठेचले पाहिजे. गरिबी आणि अगतिकतेचा फायदा घेऊन जर कोणी हिंदू समाजाला लक्ष्य करत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही. आजचा हा जनसमुदाय म्हणजे हिंदू समाजाच्या संतापाचा उद्रेक आहे. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर हा आक्रोश संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल."

# बांधकाम प्रदूषणावर महापालिकेची कडक कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

**■ धूळ व ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणासाठी नियमावली; उल्लंघन केल्यास परवानगी स्थगितीचा इशारा**

पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या बांधकाम गृह व व्यापारी प्रकल्पांमुळे होणारे धूळ व वायू प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून कडक नियमावली लागू केली आहे. त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. दीडशेहून अधिक बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्या असून, बांधकाम परवानगी स्थगित करण्याचा इशारा देण्यात आला आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण, वाढती वाहनसंख्या आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे यामुळे शहरात वायू प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, औद्योगिक परिसर तसेच, बांधकाम सुरू असलेल्या भागांमध्ये धुळीचे प्रमाण वाढले असून, वाहनांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावत असल्याचे चित्र दिसत आहे. शहरातील वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे, भोसरी, चिखली, मोशी, निगडी, पिंपरी, तळवडे, पिंपळे गुरव, कासारवाडी, सांगवी, दापोडी, आकुर्डी, पिंपळे निलख, रहाटणी, काळेवाडी, चऱ्होली, वडमुखवाडी परिसरात औद्योगिक आणि वाहतूक हालचाली मोठ्या प्रमाणावर होत असल्याने प्रदूषणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच, महामेट्रो, उड्डाण पूल आणि रस्ते विस्ताराची कामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम साहित्य उघड्यावर ठेवले जात असल्याने वाऱ्यासोबत धूळ उडून वातावरण दूषित होत असल्याचेही निदर्शनास येत आहे.

# बारावी निकालानंतर लगेच नीट; विद्यार्थ्यांवर मानसिक ताण

पिंपरी (दै. संध्या)

**■ निकाल-नीटमध्ये गॅप नसल्याने पालक-तज्ज्ञांची नाराजी; कामगिरीवर परिणामाची भीती**

राज्य शिक्षण मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेचा निकाल 2 मे रोजी घोषित करण्यात आला. दुसऱ्याच दिवशी 3 मे रोजी विद्यार्थी वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटची परीक्षा घेण्यात आली. त्यामुळे बारावीच्या निकालाचा परिणाम नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीवर होण्याची शक्यता शिक्षणतज्ञ व समुदेशक यांनी वर्तवली आहे. यामुळे पालक-विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील नीटच्या निकालात मोठी घसरण होऊन असंख्य मुलांच्या पर्सेंटाईलवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. बारावीचा निकाल एक दिवस पुढे ढकलण्यासाठी पालक, तज्ज्ञांनी मागणी करुनही मंडळ ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. मंडळाच्या या आढमुठेपणामुळे राज्यातील नीटच्या निकालात मोठी घसरण होवून असंख्य विद्यार्थ्यांच्या पर्सेंटाईवर परिणाम होण्याची शक्यता आहे. राज्यातील मुलांना पर्सेंटाईल कमी पडले अथवा निकाल घसरला, त्यासाठी राज्य शिक्षण मंडळ आणि शालेय शिक्षण विभाग जबाबदार असेल, अशा प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त करण्यात आल्या आहेत. निकालानंतर दुसऱ्या दिवशी लगेचच नीटची परीक्षा घेतल्यामुळे मानसिक ताण घेवून विद्यार्थ्यांचा परीक्षेतील गुणवत्तेवर परिणात होवू शकतो. बारावीचा निकाल आणि नीटची परीक्षा यामध्ये साधारणत: आठ ते दहा दिवसाचा गॅप असणे गरजेचे होते. नीट परिक्षेच्या आदल्या दिवशी निकाल लावण्याचा निर्णय निश्चितच संबंधित विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनावर ताण आणणारा ठरू शकतो.

# लोकमान्य टिळकांच्या स्मारकाची विटंबना

**भोवती दारूच्या बाटल्या, शेजारीच दारूचे दुकान, आयुक्तांनी तातडीने कारवाई करावी: युवराज दाखले यांची मागणी**

पिंपरी (दै. संध्या)





निगडी येथील दिवंगत मा. महापौर मधुकर पवळे उड्डाणपुलाजवळील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या अर्धाकृती स्मारकाची अत्यंत दुरवस्था झाली असून, स्मारकाच्या भोवती देशी दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या आहेत. तसेच स्मारकाच्या अगदी शेजारीच विदेशी दारूचे दुकान असल्याने वारंवार विटंबना होत असल्याचा संतप्त आरोप शिवशाही व्यापारी संघाचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी केला आहे.

याप्रकरणी दाखले यांनी महापालिका आयुक्त मा. डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" अशी सिंहगर्जना करणाऱ्या लोकमान्य टिळकांसारख्या थोर राष्ट्रपुरुषाच्या स्मारकाची अशी अवस्था समस्त भारतीयांसाठी लज्जास्पद व निंदनीय आहे,असे दाखले म्हणाले. शिवशाही व्यापारी संघाने आयुक्तांकडे खालील मागण्या केल्या आहेत, स्मारकाची तात्काळ स्वच्छता व दुरुस्ती करून सुशोभीकरण करावे, देखभालीत दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक शिस्तभंगाची कारवाई करावी, स्मारकाच्या शेजारील विदेशी दारूचे दुकान तात्काळ अन्यत्र हलवावे ,स्मारक परिसरात CCTV कॅमेरे बसवून 24x7 निगराणी ठेवावी, महापालिकेने तातडीने कार्यवाही न केल्यास हिंदू मातंग सेना व शिवशाही व्यापारी संघ यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युवराज दाखले यांनी दिला आहे.

# दापोडी-कासारवाडी-फुगेवाडीत पाणीटंचाई; कमी दाबाने पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

**उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण; टँकर व वॉटर एटीएमवर नागरिकांची मदार**

दापोडी (दै. संध्या)



> महावितरणचा शट डाऊन व निगडी जलशुद्धीकरण केंद्रातील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्याचे काम पूर्ण होत आहे. यंत्रणेत झालेल्या बदलामुळे काही भागात पाण्याचा दाब कमी झाला होता. पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू असून, लवकरच सर्व भागात सुरळीत व पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू होईल. **- साकेत पावरा, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग**
>
> नियोजित कामानंतरही पाणीपुरवठा सुरळीत होण्यास विलंब का होतो? असा प्रश्न निर्माण होत आहे. पाणी वेळेत न आल्यामुळे घरातील कामे रखडली जात आहेत. पाण्याचे जार विकत घ्यावे लागते. प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे नियोजन कार्यक्षमतेने करणे आवश्यक आहे.
> **- सुनीता अडसुळे, स्त्री जागरण मंच दापोडी**

दिवसाआड कमी दाबाने होत असलेला पाणीपुरवठा आणि यात वीज कपात यामुळे दापोडी, कासारवाडी, फुगेवाडीकर यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. मार्च, एप्रिल, मे महिन्यातील कडाक्याचा उन्हाळा आणि यात अंगाची लाही लाही होत असताना दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी या परिसरात वीज कपात आणि पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडाल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पाणी अनियमित वेळी आले तर ते कमी दाबाने येते, पाणी मिळाले तर नशीब; नाही तर पाण्यासाठी शोध मोहीम करावी लागते. जारसाठी नागरिकांना जास्त पैसे द्यावे लागत आहेत.

दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी परिसरात या गोंधळाचा सर्वाधिक फटका बसत आहे. घरामध्ये पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसेल तर नागरिकांना एकतर टँकर मागवावा लागतो; अन्यथा वॉटर एटीएममध्ये जाऊन पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. महापालिकेच्यावतीने स्थानिक रहिवाशांना पाणीपुरवठा सुरळीत मिळावा यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन जलकुंभाची निर्मिती करण्यात आली. मात्र, आजही या परिसरातील स्थानिक रहिवाशांना पाण्यासाठी भटकंती वणवण करावी लागत आहे. मिळेल त्या ठिकाणी वॉलचे आणि जारचे पाणी किंवा ज्यादा पैसे देऊन पाण्याचा टँकर घेऊन तहान भागवावी लागत आहे. परिसरातील अनेक टाक्या वेळेत भरल्या जात नाहीत. त्यामुळे अनेक नागरिकांना स्व:खर्चाने पाणी आणावे लागते. यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी जार विकत घेणे किंवा सार्वजनिक वॉटर एटीएमचा आधार घेण्याची वेळ येते. अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नोकरदार आणि गृहिणींचे नियोजन कोलमडले आहे. ऐन उन्हाळ्यात वारंवार होणाऱ्या दुरुस्तीच्या कामामुळे प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरुन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. फुगेवाडी परिसरात पाण्याची टंचाई आहे. नेहमीच्या वेळेत पाणी आले असले तरी त्याचा दाब कमी असतो. नेहमीच्या वेळेपेक्षा कमी वेळ पाणीपुरवठा झाल्याने गृहिणी, नोकरदारांची मोठी गैरसोय होत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याची मागणी वाढलेली असताना अशा प्रकारे अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### उष्ण वातावरणामुळे जनावरांना गोचीड ताप

वाल्हे (दैनिक संध्या) : सध्याच्या उष्ण व दमट वातावरणामुळे वाल्हे (ता. पुरंदर) परिसरातील पाळीव जनावरांना देखील विविध आजाराची लागण होऊ लागली असताना अनेक दुधाळ जनावरे गोचीड तापाने त्रस्त असल्याची माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.माणिक बनगर यांनी दिली. जनावरांच्या गोठ्यात असणारी अस्वच्छता तसेच गोचीड व गोमाशीच्या प्रादुर्भावामुळे संसर्गजन्य तसेच गोचीड तापाचा फैलाव होत आहे.मात्र या तापाने जनावरांची भूक कमी होऊन सर्वात मोठा फटका हा दुग्ध उत्पादनाला बसत आहे. अशातच गोचीड जनावरांच्या रक्ताचे शोषण करत असल्याने जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती देखील कमी होत असून अशी जनावरे इतर कोणत्याही आजाराला लवकर बळी पडत आहेत. त्यातच उन्हाळ्यातील प्रखर सूर्यकिरणांमुळे व पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेमुळे जनावरांत उष्माघात होऊ शकतो. उष्णतेमुळे जनावरे थकतात, त्यांची भूक मंदावते, तसेच जनावरांना तीव्हा (डेंग्यू) चे प्रमाणात वाढ होत असून, गर्भपात, अकाली प्रसूती होण्याचे प्रमाणात वाढ होत आहे.त्यामुळे पशुपालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन देखील डॉ. बनगर यांनी केले आहे.

**“मागील काही दिवसात उष्णतेमुळे गाई,म्हशी गाभण राहण्याचे प्रमाण घटले आहे.तसेच प्रसूतीनंतर वार लवकर पडत नाही.त्यामुळे जनावरांना दुपारच्या वेळी किंवा भर उन्हात चरण्यासाठी सोडू नये.तसेच वाळलेला चारा आणि खुराक शक्यतो सकाळी व संध्याकाळच्या वेळी द्यावा.दुपारच्या वेळी हिरवा चारा द्यावा. तसेच कडक ऊन्हात जनावरांच्या अंगावर थंड पाणी टाकू नये.”**

**-डॉ. समीर पवार - पशुवैद्य वाल्हे**

### भामा खोऱ्यातील विकास कामांसाठी 8 कोटी 60 लाखांचा निधी मंजूर



सुनिता बुट्टे पाटील यांची माहिती

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील भामा खोऱ्यातील विकास कामांसाठी ८ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनिता बुट्टे पाटील यांनी दिली. विकास कामांना निधी उपलब्ध करून घेण्यासाठी नेतृत्वाचे पाठबळ लागते, गाववाडी वस्तीवर संपर्क लागतो, विकास योजना माहिती असावे लागते, जनसेवा करण्याची प्रामाणिक इच्छा असावी लागते. भामा खोऱ्याच्या विकासासाठी आम्ही कायम कटिबद्ध राहत असल्याचे बुट्टे पाटील यांनी सांगितले. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते व आम्ही सर्वांनी एकत्र प्रयत्न करून जिल्हा वार्षिक योजना आराखडा तसेच सुनेत्रा पवार यांचा खासदार निधी या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणला आहे. यामध्ये वर्षानुवर्ष रखडलेल्या अनेक कामांना निधी देण्याचे काम आम्ही केले आहे. विशेष करून ज्या गावांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विकास कामांना साथ दिली. अशा अनेक छोट्या छोट्या गावांना प्रचंड मोठा निधी देण्याचे काम आम्ही केले आहे. यापुढील काळात देखील जिल्हा परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असल्याने मोठ्या प्रमाणावर सर्वच विभागातून गाव आणि वाडी वस्तीवर आम्ही विकास कामे करणार असल्याचे सुनीता शरद बुट्टेपाटील यांनी आवर्जून सांगितले.

### चाकण, महाळुंगे परिसरात कुत्र्यांची दहशत

चाकण (दैनिक संध्या) : चाकण शहर व परिसरातील महाळुंगे इंगळे भागात पुन्हा एकदा मोकाट कुत्र्यांची दहशत सुरू झाली असून, नागरिकांवर हल्ला होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेले नागरिक तातडीने अधिक उपचारासाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात धाव घेत आहेत. जखमींना रेबीज प्रतिबंधक लस दिली जात असल्याचे चाकण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे यांनी सांगितले. तसेच महाळुंगे इंगळे भागातही मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. ही कुत्री कोणावर हल्ला करतील याचा थांगपत्ता लागत नाही. त्यामुळे या मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख हभप. विनोद महाळुंगकर पाटील यांनी केली आहे.

### भाजपचा विजयोत्सव उत्साहात साजरा

मंचर (दैनिक संध्या) : पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल,आसाम आणि पडूचेरी या राज्यांमध्ये मिळालेल्या यशानिमित्त मंचर ता.आंबेगाव येथे भाजपच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करण्यात आला. या विजयोत्सवात जिल्हा सचिव संदीप बाणखेले,जिल्हा उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रमोद बाणखेले, गणेश बाणखेले,पश्चिम मंडळाचे अध्यक्ष अशोक गभाले, सरचिटणीस किरण पोखरकर,एकनाथ गावडे, यश धुमाळ, महेश भोर, निलेश काळे, अजित काळे, डॅनी बोऱ्हाडे, स्वप्निल इंदोरे,संतोष हिगे,शिवाजी बारवे, संदीप पोकळे, प्रवीण डोके,अक्षय चिखली,चैतन्य महाजन आणि अमर कराळे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, घोषणाबाजी करत व एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला. या विजयोत्सवामुळे मंचर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स पदकपातीच्या निर्णयाविरोधात पुण्यात बुधवारी आंदोलन

मंचर (दैनिक संध्या) : पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सच्या मंजूर पदांमध्ये कपात करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात बुधवार दि.६ रोजी पुणे येथे तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.पेसा मोबिलायझर संघर्ष समिती व आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम, १९९६ (पेसा कायदा) हा आदिवासी समाजाला स्वशासनाचे अधिकार देणारा ऐतिहासिक कायदा असून, तो २४ डिसेंबर १९९६ रोजी देशभर लागू झाला. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाने पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची नियुक्ती केली आहे.सन २०१६ तसेच २२ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीत एक मोबिलायझर नेमण्यात आला होता.गेल्या आठ ते दहा वर्षांपासून हे मोबिलायझर्स अत्यंत तुटपुंज्या मानधनावर गावपातळीवर काम करत असून, पेसा कायद्याची अंमलबजावणी मजबूत करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांच्या कामामुळे पेसा ग्रामसभांना बळकटी मिळत असल्याचेही दिसून येत आहे.मात्र, शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार तीन ग्रामपंचायतींसाठी एकच मोबिलायझर ठेवण्याचा निर्णय घेतला असून, हा निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. आंदोलन करण्यासाठी कॉ. मरियम ढवळे, डॉ. अजित नवले, प्रा. अजित अभ्यंकर, कॉ. विजय गाभणे, कॉ. किरण गहला, डॉ. अमोल वाघमारे, कॉ. अमोल मारकवार, कॉ. संगीता साळवे, डॉ. महारुद्र डाके व कॉ. सुदाम ठाकरे इत्यादी मान्यवर सहभागी होणार आहे.

# संयुक्त जयंतीने महामानवांच्या विचारांचा जागर होतो : डॉ. सबनीस

नारायणगाव (दै. संध्या)



वडगांव मावळ नगरीत मिलिंद युवक मंडळ ट्रस्ट व संघमित्रा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या संयुक्त जयंती महोत्सव २०२६ सोहळा संपन्न झाला

वडगाव मावळ येथे महामानवांच्या संयुक्तपणे जयंती सोहळ्याच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले,' संयुक्तपणे जयंती सोहळ्याने महामानवांच्या विचारांचा जागर होतो." समाज प्रबोधनाचे मुख्य साधन जर कोणते असेल? तर ते महामानवांची संयुक्तपणे जयंती सोहळा साजरा करणे.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाने सामाजिक ऐक्य, बंधुता, समता आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर यशस्वीपणे घडवून आणला.१ ते ३ मे दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. ०१ मे रोजी धार्मिक विधी, रक्तदान शिबिर आणि महिलांसाठी आकर्षक “खेळ रंगला पैठणीचा” हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. याच दिवशी अन्नदानाचा उपक्रम राबवून समाजाप्रती बांधिलकी जपण्यात आली.२ मे रोजी महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, जयघोष आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विविध समाजघटकांचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला. यावेळीही अन्नदानाचा उपक्रम पार पडला.

३ मे रोजी जयंती महोत्सवाचा प्रमुख पर्व जाहीर सभेच्या माध्यमातून पार पडला. या जाहीर सभेचे अध्यक्ष म्हणून मिलिंद युवक मंडळाचे विश्वस्त प्रकाश गायकवाड यांनी अध्यक्षस्थान भूषविले. “विचारांचा योद्धा” म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात वक्ते डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या प्रभावी भाषणातून महापुरुषांचे विचार, त्यांचा इतिहास आणि आजच्या काळातील महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थितांना प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लाखे सर, भास्कर आप्पा म्हाळसकर, गुलाबराव म्हाळसकर, महेंद्र म्हाळसकर, नगरसेवक शंकर भोंडवे, नगरसेवक संदीप म्हाळसकर, नगरसेवक अजय भवार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान “मावळ भूषण” जेष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन भव्य सत्कार करण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन ॲड. मिलिंद ओव्हाळ व ॲड. नितीन सावळेराम ओव्हाळ यांनी केले. प्रास्ताविक अनिल ओव्हाळ यांनी मांडले. स्वागत समितीमध्ये किरण ओव्हाळ, संदीप हिरभगत, नितीन आल्हाट व आशिष भालेराव यांनी उत्तम नियोजन केले. आभार प्रदर्शन सिद्धार्थ भालेराव व अबिद सय्यद यांनी केले.सभेनंतर रात्री महाराष्ट्रातील लोकप्रिय गायक साजन बेंद्रे व विशाल यांच्या गायनाचा कार्यक्रम पार पडून वातावरण उत्साहाने भारावून गेले.

या संपूर्ण जयंती महोत्सवाचे आयोजन जयंती महोत्सव कमिटी अध्यक्ष देवकुमार भिकाजी ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. कमिटीमध्ये कार्याध्यक्ष सोपान पाटोळे, सह कार्याध्यक्ष विजय गायकवाड व शरद टपाले, तसेच उपाध्यक्ष अनिल ओव्हाळ यांनी मोलाची जबाबदारी पार पाडली.

संघमित्रा महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनीता देवकुमार ओव्हाळ, कार्याध्यक्ष वैशाली ओव्हाळ, खजिनदार ललिता टपाले व श्रध्दा भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली “खेळ रंगला पैठणीचा” हा कार्यक्रम विशेष यशस्वी ठरला. सर्व जयंती महोत्सव कमिटी सदस्यांच्या सहकार्यामुळे हा संपूर्ण उत्सव शिस्तबद्ध, भव्य आणि यशस्वीपणे पार पडला. एकूणच, या महोत्सवाने महापुरुषांच्या विचारांची जागृती करत समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश दिला.

## बप्पासाहेब जोगदंड यांचे कार्य कौतुकास्पद - ह.भ.प. लबडे महाराज



चाकण (दै. संध्या)

समाज एकत्रित आणण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे करणारे येथील उद्योजक बप्पासाहेब जोगदंड यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोदगार समाज प्रबोधनकार हभप. नामदेव महाराज लबडे यांनी येथे काढले.

खेड तालुक्यातील मेदनकरवाडी, बालाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात मार्गदर्शन करताना लबडे महाराज बोलत होते. उद्योजक बप्पासाहेब जोगदंड व युवक नेते अरुण कुसाळकर यांच्या संकल्पनेतून मेदनकरवाडी येथे हा सोहळा सुरू होता. त्या सोहळ्याची सांगता लबडे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. नित्याचा काकडा आरती, विष्णु सहस्रनाम, श्री ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ व हरिजागराचा कार्यक्रमही उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख हभप. विनोद महाळुंगकर, उद्योजक बप्पासाहेब जोगदंड, मुक्ताजी नाणेकर, अमृत शेवकरी, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे, उद्योजक निलेश जेधे, दिलीप इंगवले, लखीचंद कटारिया, रामदास कुसाळकर, जया मोरे, डॉ. ज्ञानेश्वरी जोगदंड - पोतले, मानसी जोगदंड, सुषमा वाळेकर, अभिषेक मुटके, रेश्मा मुटके, धिरज मुटके, सूर्यकांत शिंदे, मयुर मुटके, सविता जोगदंड, मनस्वी जोगदंड आदी उपस्थित होते.

अध्यात्मा शिवाय पर्याय नाही असे सांगून लबडे महाराज पुढे म्हणाले," संत हेच समाज घडवतात. त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. संतांचा आदर्श घ्या. संस्कृतीला तडा जाऊ न देता माणुसकी आणि नाती जपायला शिका. आजची पिढी व्यसनामुळे बरबाद होत चालली असून त्यासाठी युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. मोबाईलचा अतिरेक टाळा. दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा प्रत्येकाने आपल्यातील उणिवा शोधल्या पाहिजेत." हरिनाम सप्ताहात पारायणाला बसलेल्या वाचकांना यावेळी ज्ञानेश्वरी प्रत मोफत देण्यात आली.

**नात्याला काळीमा फासणारे प्रकार घडताहेत**

“बापाला मुलगी कळेना, भावाला बहीण कळेना, दिराला आई समान असलेली भावजय कळेना. कोणी कोणावरही अत्याचार करत आहेत. राज्यात सुरू असलेले हे धक्कादायक प्रकार क्रूरतेचा कळस आहेत. अशा वासनांध नराधमांना भर चौकात चाबकाचे फटके मारून त्यांचे हात पाय छाटले पाहिजेत.”

## कांदा वावरातच सडू लागला; शेतकरी आर्थिक संकटात



मंचर (दै. संध्या)

आंबेगाव तालुक्यासह परिसरात कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या अडचणीत सापडले आहेत. वाढते तापमान, रासायनिक खते आणि विविध औषधांच्या वापरामुळे कांदा वावरातच सडू लागल्याच्या घटना वाढल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून उत्पादन असूनही उत्पन्न मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. सध्या बाजारात कांद्याला केवळ ९ ते १० रुपये किलो दर मिळत आहे.हा दर उत्पादन खर्चही भरून काढू शकत नाही,अशी शेतकऱ्यांची व्यथा आहे. सर्व क्षेत्रात महागाई वाढली असताना कांद्याचा दर मात्र मागील २० वर्षांपूर्वीच्या पातळीवरच राहिल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.शेतातच कांद्याचे ढीग पडून राहिले असून मोठ्या प्रमाणावर तो खराब होत असल्याचे चित्र दिसत आहे.पूर्वी एका शेतातून ३०० पिशव्या कांदा निघत असे, मात्र यंदा केवळ १२० पिशव्या भरता आल्या असून उर्वरित कांदा सडल्यामुळे टाकावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

**कांद्याला दर मिळत नाही आणि वावरातच तो सडतो आहे. उरलेला कांदा खराब झाला. खर्च निघत नाही.**


**- ॲड. मुकुंद वळसे पाटील, कांदा उत्पादक शेतकरी निरगुडसर.**

## मंचर येथील महात्मा गांधी विद्यालयाचा बारावी निकाल ९९.६८%

मंचर (दै. संध्या)

मंचर (ता.आंबेगाव) येथील महात्मा गांधी विद्यालयाचा इयत्ता बारावी (उच्च माध्यमिक) बोर्ड परीक्षेचा निकाल ९९.६८ टक्के इतका लागला असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकाल जाहीर होताच यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्राचार्य नितीन बाणखेले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.शास्त्र शाखेत आर्यन शेटे याने ८३.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. चतुर्थी भागडे हिने ८१.६७ टक्के गुणांसह द्वितीय, तर आर्यन कोरडे याने ७९.६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.वाणिज्य शाखेत नैतिक वाकचौरे याने ८६.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी



स्नेहल धुमाळ हिने ८५.५० टक्के गुणांसह द्वितीय, तर वेदिका गुंड हिने ८४.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा.कैलास एरंडे, प्रा. संतोष गाडेकर, प्रा. जयश्री मुळे, प्रा.संगीता गवारी, प्रा. संचिता भिडवे, प्रा.सुवर्णा येंधे व प्रा.श्वेता महाडिक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.विद्यालयाच्या या यशामुळे संस्थेचा व परिसराचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## बी. एड. छात्राध्यापकांचे स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)



ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नारायणगाव येथील बी.एड.च्या छात्राध्यापकांनी नारायणगाव बस स्थानक परिसरात स्वच्छता अभियान राबवत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. या उपक्रमाबाबत माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. बाळासाहेब मुरादे आणि कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटोळे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर मनोगतात डॉ. सुनीता पाटोळे यांनी विद्यार्थ्यांचे समाजातील स्थान अधोरेखित करताना सांगितले की, आजचा विद्यार्थी हा उद्याचा शिक्षक असून तोच देशाच्या भविष्यातील घडणीत महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षकांनी स्वच्छतेचा सद्गुण अंगीकारल्यास भविष्यातील पिढी निरोगी व सुसंस्कृत घडण्यास मदत होते. तसेच या स्वच्छता अभियानामागील उद्दिष्टे त्यांनी सविस्तरपणे स्पष्ट केली.

यावेळी मा. प्राचार्य डॉ. बाळासाहेब मुरादे यांनी मार्गदर्शन करताना “स्वच्छता हा एक महत्त्वाचा सद्गुण असून त्याचा अवलंब केल्यास समाजातील अनेक समस्या कमी होऊ शकतात.स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली असून श्रमप्रतिष्ठा या मूल्याची रुजवणूक झाली आहे. असे मत व्यक्त केले. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वच्छतेचे महत्त्व जाणून घेऊन ते आचरणात आणावे, तसेच भविष्यात शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्येही ही जाणीव निर्माण करावी, असे त्यांनी सांगितले. स्वच्छतेमुळे रोगराई कमी होऊन सुसंस्कृत समाज निर्मितीस हातभार लागतो, असेही त्यांनी नमूद केले. नारायणगाव बस स्थानक प्रमुख श्रीमती. एस .एस. कालेकर यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करत शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या अभियानात बी.एड. प्रथम वर्षाच्या छात्राध्यापकांनी उत्साहाने सहभाग घेत बस स्थानक व परिसराची स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी कचरा गोळा करून स्वच्छतेबाबत जनजागृती केली आणि नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. वैभव खराडे यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ग्रंथपाल तन्वीर सय्यद उपस्थित होते. ग्रामोन्नती मंडळ, कार्याध्यक्ष मा. अनिलतात्या मेहेर, अध्यक्ष मा. सुजितदादा खैरे, शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे चेअरमन मा. ऋषिकेश मेहेर तसेच सर्व पदाधिकारी यांनी या विधायक उपक्रमाचे मनस्वी स्वागत केले. विद्यार्थ्यांचे विकासासाठी राबवत असलेल्या अशा विधायक उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाने करावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र लेण्याद्री येथे ‘श्री गणेश महायाग’ संपन्न

जुन्नर (दै. संध्या)

मंगळवार दि.०५ मे २०२६ रोजी अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील ‘श्री गिरीजात्मज’ गणपतीचे हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेतले. दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने ‘श्री गिरीजात्मज’ गणेशाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थानचे वतीने ‘श्री गणेश महायाग’ चे आयोजन करण्यात आले होते. श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने पहाटे ५.३० वाजता



देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.


अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच जुन्नर परिसरातुन व पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक येथून मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त ‘श्री गिरीजात्मज’ गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता गोळेगाव येथील विकास सिताराम ताम्हाणे व ब्राम्हणवाडा येथील सुधीर रामदास गायकर यांनी प्रत्येकी २ कॅरेट केळी तसेच जुन्नर येथील भगत व डोके परिवार यांनी १ कॅरेट आंबे दिले. मंदिरात सकाळी ६ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. तसेच भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सेवा पुरवण्यात आल्या. अंगारक संकष्टी चतुर्थीमुळे भाविकांची व पर्यटकांची दिवसभर मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थानच्यावतीने केले होते. देवस्थानचे वतीने अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त ‘श्री गणेश महायाग’ चे आयोजन करण्यात आले होते. यात ४६ यजमानानी सहभाग घेतला होता. त्यांस आवश्यक असलेले साहित्य व सुविधा देवस्थानचे वतीने पुरविण्यात आल्या होत्या. सकाळी ९ वाजता दिप प्रज्वलन व गणेश पुजनाने ‘श्री गणेश महायाग’ चा प्रारंभ झाला. त्यानंतर विधीवत पुजा, होमहवन व महाआरती करण्यात आली. आलेल्या यजमानाचा देवस्थानचेवतीने श्रींची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, नंदकुमार बिडवई, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने व देवस्थानचे कर्मचारी तसेच मोठ्या प्रमाणात भाविक भक्त व ग्रामस्थ उपस्थित होते.

‘श्री गणेश महायाग’ करीता पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी तसेच देवस्थानचे कर्मचारी यांनी मोठे सहकार्य केले. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर नारायणगाव येथील छाया सखाराम पारधी व सखाराम कोंडीभाऊ पारधी तसेच अकोले येथील अजिंक्य मांजुलकर यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## महाराष्ट्राचे कृषिमंत्री 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६' चे उद्घाटन करणार



पुणे (दै. संध्या)

पहिल्या आवृत्तीच्या उल्लेखनीय यशानंतर, दुसरी 'बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६' ही १४–१५ मे २०२६ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथील हॉटेल हयात रीजेन्सी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्याकडून करण्यात आले असून, नोवोनेसिस आणि कान बायोसिस यांच्या सहकार्याने तसेच झायडेक्स ग्रुप आणि एपिलॉजिक इंडिया यांच्या मजबूत पाठिंब्याने हा उपक्रम साकारला जात आहे.

या कार्यक्रमाला अधिक प्रतिष्ठा लाभणार असून, महाराष्ट्र शासनाचे माननीय कृषिमंत्री श्री दत्तात्रय भरने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६'चे उद्घाटन करणार आहेत. यामुळे शाश्वत शेती क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे.

कृषी जैविक क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठे आणि प्रभावी व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिषदेत २५०० हून अधिक वरिष्ठ (C-level) प्रतिनिधी, ५० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वक्ते, १०० पेक्षा अधिक प्रदर्शक आणि १० हून अधिक देशांतील सहभागी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. कृषी मूल्यसाखळीतील ज्ञानविनिमय, जागतिक भागीदारी आणि व्यावसायिक सहकार्यांसाठी हा कार्यक्रम एक गतिमान मंच ठरणार आहे.

"कृषी जैविक क्षेत्रासाठी भारताला जागतिक केंद्र म्हणून सादर करणे" हा या परिषदेमधील मुख्य विषय असून, मजबूत संशोधन व विकास क्षमता, अनुकूल धोरणे आणि सक्षम उत्पादन व्यवस्थेच्या बळावर भारताची वाढती भूमिका यातून अधोरेखित होते.

दोन दिवसांच्या या कार्यक्रमात उच्चस्तरीय मुख्य भाषणे, धोरणात्मक चर्चा, तसेच CEO आणि CXO स्तरावरील गोलमेज परिषदांचा समावेश असेल. याशिवाय वैज्ञानिक प्रगती आणि नियामक घडामोडींवरील सखोल सत्रांमधून कृषी जैविक क्षेत्रातील बदलत्या प्रवाहांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली जाईल. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या प्रदर्शनामध्ये अत्याधुनिक उत्पादने आणि नाविन्यपूर्ण उपाय सादर केले जातील. तसेच B2B, B2G आणि गुंतवणूकदारांशी संवाद अशा विशेष नेटवर्किंग संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, ज्यामुळे अर्थपूर्ण सहकार्य आणि व्यावसायिक संबंध दृढ होतील.

या संदर्भात बोलताना, स्नेल इंटिग्रल प्रा. लि. चे संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार श्री अमित खरे म्हणाले, बायोॲग्री नेक्स्ट २०२६ हे विज्ञान, उद्योग आणि धोरण यांना एकत्र आणणारे धोरणात्मक व्यासपीठ आहे, जे जागतिक स्तरावर शाश्वत कृषी विकासाला चालना देईल आणि कृषी जैविक नवोन्मेषात भारताला अग्रस्थानी नेईल." उद्योगातील अग्रगण्य कंपन्या, संशोधन संस्था, धोरणकर्ते आणि जागतिक भागधारक यांच्या सहभागातून हा कार्यक्रम शाश्वत उपायांचा अवलंब वेगाने वाढविणे आणि जागतिक कृषी जैविक बाजारपेठेत भारताची भूमिका अधिक मजबूत करणे यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## "राज्याला पूर्ण वेळ गृहमंत्री हवा, पोक्सो न्यायालयाची अधिक निर्मिती व्हावी"

### काँग्रेस आणि पुरोगामी संघटनांकडून बालअत्याचाराच्या निषेधार्थ पिंपरीत आंदोलन




पिंपरी (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यात नुकत्याच नसरापूर आणि चाकण येथे घडलेल्या बाल लैंगिक अत्याचार आणि निर्घुण खुनाच्या घटनेच्या निषेधार्थ आणि हे रोखण्यात निष्क्रिय भाजप सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्ष आणि इतर पुरोगामी संघटनांच्या वतीने भीमसृष्टी स्मारकासमोर पिंपरी चौकात निदर्शने आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले, घडलेल्या घटना अत्यंत दुर्दैवी आहे या राज्यात महाराष्ट्र दिनी अशा घटना होणे अत्यंत क्लेशशदायक आहे. राज्याला पूर्ण वेळ गृहमंत्री पाहिजे आणि पोस्को न्यायालयांची अधिक निर्मिती व्हावी हे न झाल्याने अशा घटना वाढत असल्याचे, तसेच हे भाजप सरकार नाकर्ते असल्याचे, बनसोडे म्हणाले.

याप्रसंगी बोलताना संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे म्हणाले शिवरायांच्या काळामध्ये ज्या पद्धतीने शिक्षांचा अंमल होता, त्या पद्धतीने आज चौरंगा करण्याची गरज निर्माण झाली आहे आणि ही गरज या नाकर्त्या राज्यकर्त्यांमुळेच निर्माण झाली आहे. या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि जेवढ्या लवकर या आरोपीला फाशी दिली जाईल चांगला संदेश जाईल असे काळे म्हणाले.

ज्येष्ठ समाजसेवक पुरोगामी चळवळीचे नेते मानव कांबळे म्हणाले, तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त आणि महाराष्ट्र दिनानिमित्त अशी घटना होणे हे आपल्या सर्वांसाठी लाजिरवाणे आहे. जोपर्यंत आपण आपल्या सर्वांच्या जबाबदाऱ्या जाणून या व्यवस्थेला प्रशासनाला धारेवर धरत नाही तोपर्यंत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न मिटणार नाही आणि तोपर्यंत अशा घटना होत राहतील त्यामुळे याचे मूळ समजून त्या मुळावर घाव घालणं गरजेचे आहे असे कांबळे म्हणाले.

काँग्रेस पक्ष, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंह विद्यार्थी परिषद व सर्व समविचारी पुरोगामी संघटना पिंपरी चिंचवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आजचे निषेध आंदोलन आयोजित करण्यात आले. याप्रसंगी भाजप सरकार विरोधात, आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी या मागणीसाठी, पोस्को न्यायालयांच्या मागणीसाठी, पूर्णवेळ गृहमंत्र्यांच्या मागणीसाठी, जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

आंदोलन प्रसंगी नरेंद्र बनसोडे, सतीश काळे, समरीन कुरेशी, गिरजा कुदळे, कल्पना गीते, सोमनाथ शेळके, अभिमन्यू दहिफुले, जितेंद्र छाबडा आणि मानव कांबळे यांनी मनोगते व्यक्त केली.

याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरोगामी चळवळीचे नेते मानव कांबळे, प्रदेश काँग्रेसचे सचिव अशोक मोरे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती विष्णुपंत नेवाळे, गिरिजा कुदळे, अभिमन्यू दहीतुले, प्रदेश युवक काँग्रेसचे उमेश खंदारे, सत्यजित बिरादर, दक्षिण भारताचे मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष प्रकाश जाधव, कल्पना गीते,आबासाहेब ढवळे, वसंत पाटील,अशोक सातपुते अनिल कारंजेकर, दिलीप कैतके, संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रवीण कदम,जिजाऊ ब्रिगेड सुलभा यादव, मोनिका भोसले, कौशल्या जाधव, शितल मोरे सोनिया दिलपाक, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, ओबीसी महासंघाचे आनंदा दादा कुदळे सोमनाथ शेळके, हिराचंद जाधव, विजय ओव्हाळ, राजन नायर, बाबा गायसमुद्रे, जितेंद्र छाबडा, सार्थक बाराथे, मयूर रोकडे, पांडुरंग जगताप, भास्कर नारखेडे, राजेंद्र काळभोर, रफिक कुरेशी आदी पदाधिकारी आणि अन्य कार्यकर्त उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### एयू स्मॉल फायनान्स बँकेची शून्य चलन-विनिमय फरकासह निधी हस्तांतरण सेवा सुरु

मुंबई (दैनिक संध्या) : AU Small Finance Bank (एयू) या बँकेने आंतरराष्ट्रीय निधी हस्तांतरण क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी शून्य चलन-विनिमय फरक आणि शून्य बँक शुल्क असलेली नवी सेवा सुरू केली आहे. या उपक्रमामुळे देशांतर्गत तसेच परदेशातील व्यवहार करताना लपलेले खर्च पूर्णपणे दूर होणार असून ग्राहकांना प्रत्यक्ष संदर्भ विनिमय दरावर व्यवहार करण्याची सुविधा मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये साधारणपणे दिसणाऱ्या शुल्कांव्यतिरिक्त विनिमय दरामध्ये लपलेला अतिरिक्त फरक आकारला जातो. हा 'अदृश्य खर्च' अनेक वर्षांपासून ग्राहकांवर पडत होता. एयू बँकेच्या नव्या सेवेमुळे हा लपलेला खर्च पूर्णतः काढून टाकण्यात आला असून व्यवहार करताना कोणताही अतिरिक्त दरफरक किंवा शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे परदेशात शिक्षणासाठी निधी पाठवणारे पालक, कुटुंबीयांना आर्थिक मदत करणारे नागरिक तसेच गुंतवणुकीसाठी निधी पाठवणाऱ्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही सेवा Liberalised Remittance Scheme अंतर्गत परदेशात निधी पाठवणाऱ्या भारतीयांसाठी उपयुक्त ठरणार असून परदेशस्थ भारतीय नागरिकांनाही (एनआरआय) या योजनेचा लाभ मिळणार आहे. परदेशातून भारतात निधी पाठवताना कोणताही चलन-विनिमय फरक किंवा बँक शुल्क लागू होणार नसल्याने परदेशात कमावलेली रक्कम अधिक प्रमाणात कुटुंबीयांपर्यंत पोहोचेल. बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम तिब्रेवाल यांनी सांगितले की, ग्राहकांना व्यवहाराच्या शेवटी किती रक्कम मिळेल याबाबत असलेली अस्पष्टता दूर करणे हेच या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट आहे. बँकिंग सेवा सोपी, स्पष्ट आणि न्याय्य करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले.

### गडचिरोलीत मोबाइलच्या मदतीने उत्तरे शोधणारा कॉपीबहाद्दर जाळ्यात

गडचिरोली (दैनिक संध्या) : वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा करणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत घेतलेल्या 'नीट'मध्ये शहरात दोन केंद्रांवर हायटेक कॉपीचे खळबळजनक प्रकार ३ मे रोजी उघडकीस आले आहेत. कडक सुरक्षा यंत्रणा आणि तपासणीला बगल देऊन दोन विद्यार्थी थेट परीक्षा केंद्रात मोबाइल घेऊन शिरले. चक्क एआयच्या मदतीने प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या एका विद्यार्थ्यासह एका विद्यार्थिनीवर गडचिरोली ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शहरातील धानोरा मार्गावरील शिवाजी महाविद्यालयाच्या केंद्रावर (क्र. ३१२५१०२) एकूण ३६० विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था होती. परीक्षा सुरू असताना दुपारी ३:४०च्या सुमारास खोली क्र. ६मधील पर्यवेक्षक राजेश पाटील आणि राखी मुधोळकर यांना चंद्रपूरच्या नागभिड येथील २० वर्षीय विद्यार्थिनीच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. तिची तपासणी केली असता, आकाशी रंगाचा मोबाइल मिळून आला. धक्कादायक म्हणजे, तिने यावर्षीचा पेपर आपल्या वस्त्रात लपवून ठेवला होता आणि जुन्या वर्षाचा पेपर मुख्य पृष्ठाला जोडून कॉपी करण्याची तयारी केली होती. शहरातील गोकुळनगरातील शिवाजी महाविद्यालयाच्या केंद्रावर (क्र. ३१२५१०१) आष्टी येथील १७ वर्षीय परीक्षेत मोबाइल घेऊन बसला होता. दुपारी २:२७च्या सुमारास पर्यवेक्षक मनीष बानबले यांनी त्याला मोबाइलसह पकडले. परीक्षेची वेळ संपल्यानंतर मोबाइलची तपासणी केली असता, गॅलरीमध्ये प्रश्नपत्रिकेचे फोटो आढळून आले. विशेष म्हणजे, त्याने एआयला प्रश्न पाठवून उत्तरे मिळवल्याचे चॅटिंगवरून स्पष्ट झाले आहे.

## पोलीस भरती परीक्षेत खासगी पुस्तकातीलच प्रश्न

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र पब्लिकेशनने प्रसिद्ध केलेल्या पोलीस भरती प्रश्नपत्रिका संचमधील प्रश्नच पोलीस भरती परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत असल्याने संपूर्ण भरती प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दावा केला आहे की, पोलीस भरती प्रश्नपत्रिकेतील १०० पैकी ८५ प्रश्न या खासगी पुस्तकातील आहेत. यासंदर्भातील काही व्हॉट्स चॅटिंगही समोर आले आहेत. त्यामुळे प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर शंका उपस्थित होऊ लागली आहे. काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी काही फोटो शेअर करत प्रश्न उपस्थित केले आहेत. वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की, "राज्यात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांच्या आयुष्याशी सरकार अक्षरशः खेळ करत आहे. आता हे उघडपणे दिसू लागले आहे." वडेट्टीवार यांनी पोलीस भरती परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि पुस्तकातील प्रश्नांचा फोटो पोस्ट केला आहे. ज्यात सगळे प्रश्न सारखेच आणि क्रमवारीत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र अकादमी नावाने व्हॉट्सअपवर ग्रुप आहे. त्यात आमचा तर वशिला आहे, ८५ प्रश्न जसेच्या तसे आले आहेत. पब्लिकेशन अकादमीशिवाय पर्याय नाही, असे संवाद आहेत. "महाराष्ट्र पोलीस भरतीतील एसआरपीएफ गट ५, दौंड येथील लेखी परीक्षा म्हणजे पारदर्शकतेचा विनोदच ठरला. तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका तयार करावी अशी अपेक्षा असताना, १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न एका खासगी प्रकाशनाच्या पुस्तकातून जसेच्या तसे उचलले गेले. मग ही परीक्षा होती की त्या पुस्तकाची ओपन बुक टेस्ट?", असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी केला. "ही चूक नाही, ही व्यवस्था ढासळल्याची स्पष्ट निशाणी आहे. पोलीस भरतीसारख्या संवेदनशील प्रक्रियेत असा प्रकार घडतो, म्हणजे आतूनच कुठेतरी साखळी जुळलेली आहे का असा प्रश्न निर्माण होतो.

## 'मिसिंग लिंक'वर महापौर रवी लांडगेंचा फोटो

### महामार्ग पोलिसांनी कारवाई केली का? जनतेचा प्रश्न

पिंपरी (दै. संध्या)



मिसिंग लिंक मार्गावर सेल्फी अथवा फोटो काढण्यासाठी वाहन थांबवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा महामार्ग पोलिसांनी नुकताच दिला होता. मात्र, या इशाऱ्यानंतर अवघ्या काही तासांत पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी मिसिंग लिंकवर थांबून फोटो काढल्याचे आणि तो सोशल मीडियावर शेअर केल्याचे समोर आल्याने आता महामार्ग पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिसिंग लिंक मार्गावर वाहनांचा वेग ताशी 100 ते 120 किलोमीटरपर्यंत असतो. त्यामुळे या मार्गावर वाहन थांबवणे धोकादायक असून, जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, असे सांगत महामार्ग पोलिसांनी सामान्य वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई सुरू केली होती. काही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्याचाही इशारा देण्यात आला होता.

अशा परिस्थितीत महापौर रवी लांडगे यांनी मुंबईकडे जाताना मिसिंग लिंकवर फोटो काढला आणि तो फेसबुकवर पोस्ट केला. त्यानंतर सोशल मीडियावर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत महामार्ग पोलिसांना सवाल विचारण्यास सुरुवात केली. "सामान्य नागरिकांसाठी एक नियम आणि व्हीआयपींसाठी वेगळा नियम का?" असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे. नागरिकांच्या मते, जर महामार्ग पोलिसांनी सर्वसामान्य वाहनचालकांवर कारवाई केली असेल, तर महापौरांच्या वाहनावरही तशीच कारवाई झाली का? त्यांना विशेष परवानगी देण्यात आली होती का? वाहन थांबवून फोटो काढण्यास मुभा कोणी दिली? याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी देखील मिसिंग लिंकवर फोटो काढून सोशल मीडियावर पोस्ट केल्याची चर्चा आहे. त्यांच्या वाहनावरही कोणती कारवाई झाली का, याबाबत स्पष्टता नसल्याने महामार्ग पोलिसांच्या कारवाईत दुहेरी निकष लावले जात असल्याची टीका होत आहे.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते बहुचर्चित मिसिंग लिंकचे लोकार्पण करण्यात आले. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधून उभारण्यात आलेला हा मार्ग आणि झुलता पूल पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक आणि वाहनचालक आकर्षित होत आहेत. मात्र, या आकर्षणातून अनेक जण वाहन थांबवून फोटो व सेल्फी काढत असल्याने अपघाताचा धोका वाढत आहे. यामुळेच महामार्ग पोलिसांनी कठोर भूमिका घेत कारवाईचा इशारा दिला होता. आता त्याच नियमांची अंमलबजावणी व्हीआयपी व्यक्तींवरही होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढण्यास सुरुवात; पावसाळ्यापूर्वी हालचाल

### प्रदूषण व आरोग्याच्या धोक्यामुळे कारवाई; नदी स्वच्छतेकडे प्रशासनाचे लक्ष

लोणावळा (दै. संध्या)

शहरामधून उगम पावत पूर्वेच्या दिशेने वाहणाऱ्या इंद्रायणी नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली होती. पावसाळा तोंडावर आला असूनही जलपर्णी काढण्याचे काम थंडावले होते. यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध होताच नगर परिषद प्रशासनाकडून जलपर्णी काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. लोणावळ्यातील काही नगरसेवकांनीदेखील सतत जलपर्णी काढण्याची मागणी केली होती. याची दखल घेत नगर परिषद प्रशासनाकडून नदीपात्र स्वच्छता व जलपर्णी काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. शहरामधून नदीपात्राचे साधारणता साडेतीन ते चार किलोमीटर अंतर आहे. या संपूर्ण पात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी झाली असून, संपूर्ण पात्र हे हिरवेगार झाले आहे. राज्यभरात सध्या सर्वत्र अवकाळी पाऊस पडत आहे व पुढील दोन महिन्यांत मान्सूनच्या पावसालादेखील सुरुवात होणार आहे. मागील वर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच पावसाला सुरुवात झाली होती. या सर्व बाबींचा विचार करत लोणावळा नगर परिषदेने इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी काढण्याच्या कामाला तातडीने सुरुवात करावी व काढलेली जलपर्णी ही नदीपात्राच्या कडेला न ठेवता ती दुसरीकडे वाहून नेऊन तिची विल्हेवाट लावावी, अशी मागणी करणारे वृत्त प्रसिद्ध झाले होते. लोणावळा धरणापासून ते वलवण गावाच्या हद्दीपर्यंत नदीपात्र संपूर्ण जलपर्णीच्या विळख्यामध्ये आहे. सध्या कडक उन्हाळा आहे. त्यामुळे जलपर्णी काढल्यास ती उन्हामध्ये जळून जाऊ शकते. लोणावळ्यात काही कोटी रुपये खर्च करुन भुयारी गटार व ड्रेनेज योजना राबविण्यात आली. मात्र, तरीदेखील मोठ्या प्रमाणात ड्रेनेज पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने नदीचे पावित्र्य धोक्यात आले आहे. त्याकडेदेखील नगर परिषदेने लक्ष देणे गरजेचे आहे. पावसाळा जेमतेम एक महिन्यावर आला असल्याने लोणावळा नगर परिषदेने इंद्रायणी नदी तसेच शहरातील नाले सफाईच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र, हे काम योग्य प्रकारे होत आहे की नाही यावर लोणावळा नगर परिषदेच्या अधिकारी तसेच नगरसेवकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. इंद्रायणी नदी सफाईच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीला काम अगदीच वरवर सुरू होते. याबाबत नागरिकांनी तक्रार केल्यानंतर पुन्हा जलपर्णी काढलेल्या ठिकाणी गाळ काढण्यास सुरुवात केली आहे. तसेच, वरवर काढलेली जलपर्णी पुन्हा मुळांपासून काढण्यास सुरुवात केली आहे. जलपर्णी काढल्यानंतर ती नदीच्या काठावर न ठेवता ती वाहून नेऊन दुसरीकडे टाकावी; अन्यथा पावसात पुन्हा ती वाहून नदीपात्रात येते, असे नागरिकांनी सांगितले आहे.

## आर.टी.ई. प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, ऑनलाइन व विनामूल्य




पिंपरी (दै. संध्या)

आर.टी.ई. अंतर्गत राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया ही शासनाच्या नियमांनुसार पूर्णपणे पारदर्शक, ऑनलाइन व विनामूल्य राबविण्यात येते. या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही तसेच अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी, संगणकीय लॉटरी व प्रवेश निश्चिती या सर्व टप्प्यांमध्ये कोणत्याही व्यक्ती किंवा मध्यस्थाची आवश्यकता नसते, अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली.

अलीकडील काळात काही ठिकाणी आर.टी.ई. प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली पालकांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही व्यक्ती स्वतःला शाळेशी किंवा शिक्षण विभागाशी संबंधित असल्याचे भासवून प्रवेश निश्चित करून देण्याचे आमिष दाखवत आहेत. अशा प्रकारे पैसे मागणे किंवा देणे हे पूर्णतः बेकायदेशीर असून यामुळे पालकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता आहे.

आर.टी.ई. अंतर्गत कोणालाही पैसे देऊन प्रवेश मिळवता येत नाही. प्रवेश प्रक्रिया ही शासनाच्या अधिकृत पोर्टलवर आधारित असून, संगणकीय पद्धतीने लॉटरी काढून विद्यार्थ्यांची निवड केली जाते. अर्जाची पडताळणी ही केवळ सादर केलेल्या कागदपत्रांवर आधारित असते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीकडे पैसे देऊन प्रवेश मिळेल, असे सांगितले जात असल्यास ते दिशाभूल करणारे आहे, असे देखील शिक्षण विभागातून स्पष्ट करण्यात आले.

शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार असून तो कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहाराशी जोडलेला नाही. त्यामुळे पालकांनी सजग राहून अशा गैरप्रकारांना बळी पडू नये. आर.टी.ई. अंतर्गत प्रवेशासाठी पैसे मागितल्यास तात्काळ शिक्षण विभागात तक्रार करावी.

**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक, संगणकीकृत व शासनाच्या नियमानुसार राबविण्यात येत असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थीला स्थान नाही. पालकांनी अधिकृत पोर्टलवरूनच अर्ज करावा आणि कोणत्याही आमिषांना बळी पडू नये. प्रवेशासाठी पैसे मागणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल तसेच अशा तक्रारींवर तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**– डॉ.विजय सूर्यवंशी आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक, संगणकीकृत व विनामूल्य आहे. कोणत्याही पालकांनी प्रवेशासाठी कोणालाही पैसे देऊ नयेत. काही व्यक्ती चुकीची माहिती देऊन पालकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र अशा गैरप्रकारांना शिक्षण विभागाकडून कडक कारवाई करण्यात येईल.

**– ममता शिंदे, उपायुक्त, शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महापालिका.**

### पालकांनी अशी घ्यावी काळजी

- कोणत्याही एजंट, मध्यस्थ किंवा अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये.
- प्रवेश प्रक्रियेसाठी कोणालाही रोख, ऑनलाइन किंवा इतर कोणत्याही स्वरूपात पैसे देऊ नयेत.
- केवळ शासनाच्या अधिकृत आर.टी.ई. पोर्टलवरूनच अर्ज करावा आणि अर्जाची स्थिती स्वतः तपासावी.
- कागदपत्र पडताळणी करताना संबंधित शाळा किंवा अधिकृत केंद्रातच उपस्थित राहावे.
- अधिकृत पावतीशिवाय कोणतीही रक्कम देऊ नये.
- जर कोणतीही व्यक्ती आर.टी.ई. प्रवेशासाठी लाच किंवा पैशांची मागणी करत असल्याचे आढळल्यास, नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना याबाबत कळवावे.
- शक्य असल्यास संबंधित संभाषण, कागदपत्रे किंवा अन्य पुरावे जतन करून सादर करावेत.
- तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल व योग्य ती कारवाई करण्यात येईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नसरापूर घटनेतील नराधमाला फाशी देण्यात यावी यासाठी माळेगावकरांची मागणी

माळेगाव (दैनिक संध्या) : माळेगाव शहरातील विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने नसरापूर घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी,अशी मागणी निवेदनाद्वारे माळेगाव पोलिस ठाण्यास करण्यात आली असून या निवेदनाचा स्विकार उपनिरीक्षक शरद तावरे यांनी केला. नसरापूर ता. भोर येथे कांबळे नावाच्या नराधमाने चार वर्षिय बालिकेवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या केली होती.या घटनेमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली असून नराधमास तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी राज्यात जोर धरत आहे.माळेगाव शहरातील राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (दोन्ही गट),बहुजन हक्क परिषद,रिपाई,मुस्लिम संघटना,बौद्ध युवक संघटना,युवा शक्ती संघटना यांच्या वतीने नराधमाला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर बहुजन हक्क परिषदेचे जिल्हाध्यक्ष केशवराव भोसले,माजी सभापती संजय भोसले,तालुका अध्यक्ष बाबा घोडके,रिपाईचे तालुका युवकाध्यक्ष विश्वास भोसले,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा अध्यक्ष मयुर भोसले, मुस्लिम संघटनेचे रियाज शेख,माजी सदस्य रुपेश भोसले,पिनु खरात , सुनील भोसले,प्रा.किशोर भोसले, राहुल भोसले यांच्यासह इतरांच्या सह्या आहेत.

### सर्वंकष नियोजनाबाबत महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या संबंधित विभागांना सूचना

पुणे (दैनिक संध्या) : आगामी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्यवस्थापन सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्वंकष नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पालखी मार्गावरील संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवणे, स्वागत मंडळाकडून स्पीकर व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करणे, तसेच ठिकठिकाणी स्वच्छतागृहे उभारणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत, आगमन व प्रस्थान मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी. मुख्य ठिकाणी जलपान, वैद्यकीय तपासणी व आवश्यक सेवा केंद्रे उभारण्यात यावीत. तसेच, माणूसबळ, शाळा व प्रशासकीय यंत्रणा यांचा योग्य समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी. भाविकांच्या सोयीसाठी PMPML बससेवा योग्य ठिकाणी उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. बोपोडी परिसरात पालखी जाताना तीव्र चढ-उतार असल्याने तेथे 'हाइट बॅरिअर' उभारण्याची सूचना करण्यात आली असून, संबंधित काम PWD मार्फत तातडीने पूर्ण करावे. उत्सव काळात प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचे नियोजन काटेकोरपणे अंमलात आणण्यात यावे. संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी आगमनाच्या वेळी होणारी गर्दी लक्षात घेता, होळकर पुल परिसरातील ५ तासांचा कालावधी कमी करण्याबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, पालखी सोहळा प्रमुख मार्गांवर सर्व सोयीसुविधा पूर्ण केल्यानंतर त्याचे संपूर्ण नियोजन व्यवस्थित पार पाडण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधावा. आवश्यक असल्यास 'रेनकोट' व इतर साहित्याचीही उपलब्धता सुनिश्चित करावी. बोपोडी व खडकी परिसरात पालखी विश्रांती वेळ सुमारे १५ मिनिटे निश्चित करण्यात येणार असून, भाविकांना दर्शन घेण्यासाठी योग्य व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रशासनाने सर्व संबंधित विभागांशी समन्वय ठेवून पालखी सोहळा सुरळीत, सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पालखी सोहळ्यासाठी 'मास्टर प्लॅन'; सुरक्षित, शिस्तबद्ध आयोजनासाठी सर्व यंत्रणा सज्ज



आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका भवनात मंगळवारी महत्त्वाची नियोजनात्मक आढावा बैठक पार पडली. महापौर मंजुषाताई नागपुरे आणि आयुक्त नवलकिशोर राम यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सोहळा सुरळीत, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी विविध बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली. वारकरी संप्रदायाच्या परंपरेला साजेसा आणि शिस्तबद्ध सोहळा घडवण्यासाठी पालखी मार्गावरील स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला. तसेच वारकऱ्यांसाठी निवास व विश्रांती व्यवस्था सक्षम करण्यासोबत आपत्कालीन सेवांची तयारी आणि सर्व विभागांमधील समन्वय अधिक बळकट करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. बैठकीस उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृहनेते गणेश बीडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, ओमप्रकाश दिवटे, प्रजित नायर, सहाय्यक आयुक्त रंजन कुमार, पोलिस उपायुक्त हिंमत जाधव आदी अधिकारी उपस्थित होते. तसेच ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखने, पालखी सोहळाप्रमुख अ‍ॅड.राजेंद्र उमाप, देहू संस्थानचे ह.भ.प. उमेश मोरे, दिंडी संघटनांचे प्रतिनिधी भाऊ महाराज फुरसुंगीकर, सोहळामालक राजेंद्र आरफडकर, विश्वस्त रोहिणी पवार, राजाभाऊ भुजबळ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारीही उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन आणि वारकरी प्रतिनिधींमध्ये समन्वय राखत नियोजनाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यावर बैठकीत एकमत झाले.

### 15 कोटींच्या निधीवरून आळंदी शिवसेनेत 'श्रेयवाद' पेटला

आळंदी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र आळंदीतील विकासकामांसाठी मंजूर होणाऱ्या १५ कोटी २० लाख रुपयांच्या निधीवरून शिवसेनेत 'श्रेयवादाचा' वाद चिघळला आहे. शिवसेना नगरसेवक सुरेश नाना झोंबाडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची एकट्याने भेट घेऊन निधी मंजुरीसाठी मागणीपत्र दिल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आळंदीतील विविध विकासकामांसाठी निधी मिळवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने संयुक्त शिष्टमंडळाद्वारे पाठपुरावा करण्याचे नियोजन झाले होते. आमदार शरद सोनवणे, जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, शहरप्रमुख राहुल चव्हाण, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी याबाबत चर्चा करून उपमुख्यमंत्री शिंदे यांची एकत्रित भेट घेण्याचे ठरवले होते. मात्र, या नियोजनाला धक्का देत नगरसेवक झोंबाडे यांनी संबंधित नेते व पदाधिकाऱ्यांना पूर्वकल्पना न देता थेट उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने पक्षात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कृतीमुळे स्थानिक संघटनेला डावलण्यात आल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. शहरप्रमुख राहुल चव्हाण यांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. "निधीसाठी सर्वांनी मिळून भेट घेण्याचे ठरले होते. मात्र आम्हाला विश्वासात न घेता ही भेट घेण्यात आली," असे त्यांनी सांगितले. दरम्यान, विकासकामांसाठी निधी मिळणे ही सकारात्मक बाब असली, तरी त्यासाठी पक्षांतर्गत समन्वयाऐवजी 'वैयक्तिक श्रेय' मिळवण्याच्या प्रयत्नांमुळे गटबाजी उघड होत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

# लवचिकता, उपचार आणि मानवी संबंधांची कथा : महेश्वरीला एफआरएनडीची साथ

पुणे (दै. संध्या)

सध्याच्या वाढत्या वेगवान आणि डिजिटल जगात अर्थपूर्ण मानवी नातेसंबंध बहुतांश वेळेस दुर्मिळ होऊन बसतात. अशाच परिस्थितीतून गेलेल्या चेन्नईच्या एका तरुणीला एफआरएनडी या ॲपच्या साहाय्याने केवळ साथ मिळाली नाही तर स्वतःचा सूरही गवसला. तेव्हा भावनिक स्वास्थ्य आणि आत्म-अभिव्यक्तीच्या दिशेने तिच्या प्रवासात या ॲपचा शोध हे एक परिवर्तनकारी वळण ठरले आहे.

महेश्वरी ही चेन्नईत राहणारी ३५ वर्षीय टेलर. सोशल मीडियातील इन्फ्लुएन्सर, परंतु घटस्फोटाच्या त्रासदायक प्रक्रियेतून गेल्यानंतर माहेश्वरी प्रचंड, एकटेपणा, ताण आणि जागरणाचा सामना करत होती. सोशल मीडियातील इन्फ्लुएन्सर म्हणून समाजात सक्रिय असूनही डिजिटल प्रसिद्धीमुळे प्रत्यक्षात संबंध निर्माण होत नाही, याची जाणीव तिला झाली. "तुमची सामग्री नेमक्या कोणापर्यंत पोहोचते हे तुम्हाला कधीच कळत नाही," असे सांगून प्रेक्षकांचा सहभाग आणि खरा मानवी संवाद यांमधील दरी तिने अधोरेखित केली.

याच आव्हानात्मक काळात एका मैत्रिणीने तिची एफआरएनडी या ॲपशी ओळख करून दिली. एका शिफारशीने सुरू झालेली ही गोष्ट लवकरच तिच्यासाठी हक्काचा आधार बनला. पारंपारिक सोशल किंवा डेटिंग प्लॅटफॉर्मच्या तुलनेत महेश्वरीला हा प्लॅटफॉर्म अधिक जिव्हाळ्याचा आणि वैयक्तिक असल्याचे, यात थेट आणि अर्थपूर्ण संभाषण करण्याची संधी मिळत असल्याचे जाणवले.

तिच्या अगदी पहिल्या अनुभवापासून तिला तो प्लॅटफॉर्म अगदी स्वाभाविक वाटला. महेश्वरी यांना बोलायला आवडते, त्यामुळे लोकांशी संवाद साधायला, गोष्टी सांगायला आणि त्यांच्या गोष्टी ऐकायला तिला आवडते. आज ती दररोज अनेक तास त्या ॲपवर घालवते, त्यात ती प्रामुख्याने भावनिक नाते आणि समजूतदारपणा वाढवणाऱ्या संभाषणांमध्ये सहभागी होते.

सुरुवातीला एकटेपणावरचा उपाय म्हणून सुरू झालेली ही गोष्ट लवकरच एक उद्देश बनली. महेश्वरी ने हे व्यासपीठ केवळ लोकांशी संपर्क साधण्यासाठीच नव्हे, तर समाजाला काहीतरी परत देण्यासाठी, आपल्या शब्दांद्वारे इतरांवर प्रभाव टाकणे, त्यांना सक्षम करणे आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी वापरायला सुरुवात केली. घेणाऱ्याच्या भूमिकेतून देणाऱ्याच्या भूमिकेकडे झालेला हा बदल तिच्या प्रवासातील सर्वात समाधानकारक पैलूंपैकी एक ठरला. महेश्वरीच्या दृष्टीने हा प्लॅटफॉर्म खऱ्या अर्थाने वेगळा ठरण्याचे कारण म्हणजे शेरेबाजीचा (जजमेंट) अभाव. इतर संवादांमध्ये गैरसमज होण्याच्या भीतीने लोक अनेकदा पुढे येत नाहीत. याउलट या प्लॅटफॉर्मवर तिला स्वतःला अभिव्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य जाणवते. "इथे कोणतेही बंधन नाही," असे सांगून इथे प्रत्येकजण आपल्यातील कमकुवत बाजू घेऊन येतो, ज्यामुळे एकमेकांना समजून घेण्याची एक सामायिक जागा निर्माण होते असे ती नमूद करते.

अशा डिजिटल माध्यमांशी अपरिचित असल्याने, सुरुवातीला ती संकोचानेच या प्लॅटफॉर्मवर आली. मात्र कालांतराने तिचा भरवसा वाढत गेला. दैनंदिन कम्युनिटी सेशन्ससारख्या उपक्रमांसोबतच वापरकर्ता सुरक्षिततेची हमी देण्यासाठी तयार केलेली वैशिष्ट्ये, यांमुळे तिला सुरक्षित आणि आधार मिळाल्यासारखे वाटले. आज ती या प्लॅटफॉर्मचे वर्णन एक अशी जागा म्हणून करते जिथे ती कोणतीही भीती न बाळगता स्वतःचे खरे रूप दाखवू शकते.

महेश्वरी एक टेलर या नात्याने समाधानी व्यावसायिक जीवन जगत आहे. तरीही, या प्लॅटफॉर्मने त्यात एक नवीन पैलू जोडला आहे. तिला तिच्या घरच्या निवांतपणात राहून तिच्या सभोवतालच्या परिसराबाहेरील लोकांशी संपर्क साधता येत आहे. भावनिक स्वास्थ्याची सुरुवात अनेकदा आपले म्हणणे ऐकले जाण्यातून होते, याची एक प्रभावी आठवण महेश्वरीची कहाणी करून देते. सोबतीच्या शोधामध्ये सुरू झालेला हा प्रवास पुढे आत्म-अभिव्यक्ती, सहानुभूती आणि प्रभावाचा प्रवास बनला आहे. एफआरएनडी वर स्वतःचा आवाज गवसत असतानाच तिने केवळ स्वतःलाच नव्याने ओळखले नाही, तर स्वतःच्या संघर्षातून मार्ग काढणाऱ्या इतरांसाठी ती एक शक्तीचा स्रोत बनली आहे.

## ब्लॅक डॉग स्कॉच व्हिस्कीकडून नवीन आकर्षक पॅकेजिंग केले सादर

पुणे (दै. संध्या)

ब्लॅक डॉग व्हिस्की या भारतातील अत्यंत प्रतिष्ठित ब्लेंडेड स्कॉच व्हिस्की ब्रँडने आपले नवीन आणि प्रगत पॅकेजिंग सादर केले आहे. हे नवीन डिझाइन गेल्या १४० वर्षांहून अधिक काळ चालत आलेल्या समृद्ध वारशाचा आत्मविश्वासपूर्ण टप्पा आहे. यामध्ये बाह्य रूपामध्ये बदल करण्यात आला असून त्यामधून ब्रँडचे मूळ वैशिष्ट्य दिसून येते, जे ग्राहकांना क्षणभर थांबून प्रत्येक सिपचा मनसोक्त आस्वाद घेण्याचे आवाहन करते. हे नवीन डिझाइन अतिशय सूक्ष्म आणि प्रगत अशा 'सेव्हर कोड्स'सह सादर करण्यात आले आहे. यामध्ये अत्यंत बारकाईने केलेले काम, प्रीमियम दर्जाचे संकेत आणि सुस्पष्ट मांडणी यांचा समावेश आहे. हे डिझाइन आजच्या तरुण आणि बदलत्या पिढीच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन तयार केले आहे, तरीही यात ब्लॅक डॉगची मूळ ओळख कायम राखण्यात आली आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी ब्रँडची 'सेव्हर द सिप'संकल्पना आहे - स्कॉच पिणे ही एक घाईघाईची कृती नसून सजग आणि तल्लीन करणारा अनुभव असावा, असे हे आमंत्रण आहे. स्कॉटलंडमधील निवडक डिस्टिलरीजमधून, विशेषतः प्रसिद्ध लिंकवूड डिस्टिलरीमधून, जिथे निष्णात कारागीर प्रत्येक थेंबाला परिपूर्ण बनवतात, हा ब्लेंड तयार केला जातो. ही व्हिस्की थ्री-कास्क मॅच्युरेशन प्रक्रियेतून जाते, ज्यामधून कारागिरी आणि फ्लेवरमधील सूक्ष्म बारकावे दिसून येतात.

## ३१ मेपर्यंत पाणीकपात रद्द – महापौरांचे निर्देश

पुणे (दै. संध्या)



आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी आज माननीय महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महापौरांनी ३१ मेपर्यंत पाणीकपात रद्द करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

बैठकीत शहरातील विद्यमान पाणीसाठा, जलशुद्धीकरण व्यवस्था, वितरण प्रणाली तसेच संभाव्य पाणीटंचाईच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे शहराला पानशेत, वरसगाव, टेमघर व खडकवासला या धरणांमधून पाणीपुरवठा होत असून, सध्याच्या साठ्याचा आढावा घेण्यात आला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाणी गुणवत्तेबाबत पर्वती जलकेंद्र प्रयोगशाळेमध्ये दरमहा अनेक नमुन्यांची तपासणी करण्यात येत असून, WHO व CPHEEO मार्गदर्शक तत्त्वांनुसार गुणवत्ता राखली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये क्लोरीनेशन प्रक्रिया सक्षम ठेवण्यात आली असून, आवश्यक रसायनांचा (PAC व क्लोरीन) पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे. शहरातील १७ जलशुद्धीकरण प्रकल्पांची देखभाल, क्लेरीफायर व फिल्टर बेडची स्वच्छता तसेच यंत्रणांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे. पावसाळ्यात वाढणाऱ्या गढूळपणाच्या पार्श्वभूमीवर पाणी शुद्धीकरण प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जुन्या हद्दीसोबतच नव्याने समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असून, त्यामध्ये जलशुद्धीकरण केंद्र, पंपिंग स्टेशन, पाण्याच्या टाक्या व वितरण लाईन उभारण्यात येणार आहेत.

तसेच, पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी AI आधारित लीक डिटेक्शन, रोबोटिक कॅमेरा तपासणी, वाहन ट्रॅकिंग प्रणाली व मोबाईल ॲपद्वारे नियंत्रण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

बैठकीत कनिष्ठ अभियंते, तांत्रिक कर्मचारी व मीटर रीडर्स यांच्या रिक्त पदांची पूर्तता तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

माननीय महापौरांनी प्रशासनाला निर्देश दिले की, ३१ मेपर्यंत पाणीकपात रद्द करून नागरिकांना अखंड, स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करावा. तसेच सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून तातडीने कार्यवाही करावी. आगामी मान्सून काळात कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यावर विशेष भर देण्यात आला.

## महालक्ष्मी सरस मध्ये अहिल्यानगरच्या मंगला वाकचौरे यांची कमाल

### मडक्यातील लोणचं ४ दिवसांत ४० किलो विक्री, १,००० रुपये किलो दर

पुणे (दै. संध्या)




उमेद अभियानाच्या माध्यमातून आयोजित महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये राज्यभरातून आलेल्या महिला उद्योजकांनी आपल्या व्यवसाय, हस्तकला आणि खाद्यपदार्थांद्वारे वेगळी ओळख निर्माण केली आहे. या मेळ्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील पिंपळगाव निपाणी गावच्या मंगला संजीव वाकचौरे (वय ४० वर्षे) यांनी मडक्यातील पारंपरिक लोणच्यांमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

२ मेपासून सुरू झालेल्या या मेळ्यात अवघ्या चार दिवसांत मंगला वाकचौरे यांनी ४० किलो लोणचं प्रति किलो १,००० रुपयांच्या दराने विक्री केली आहे. साडेचारशेहून अधिक स्टॉल्समधून त्यांच्या लोणच्यांचा स्टॉल हा सर्वाधिक महागड्या आणि तितकाच लोकप्रिय स्टॉल म्हणून ओळखला जात आहे. मंगला वाकचौरे या गेली १० ते १५ वर्षे घरगुती पद्धतीने लोणचं बनवत होत्या, तर सुमारे अडीच वर्षांपासून त्यांनी याला व्यवसायाचे स्वरूप दिले. उमेद अभियानात सहभागी झाल्यानंतर त्यांना व्यवसाय वाढवण्याची दिशा मिळाली. या माध्यमातून त्यांना स्वतःचा ब्रँड तयार करणे, उत्पादनाची गुणवत्ता राखणे आणि बाजारपेठ कशी वाढवायची याचे प्रशिक्षण मिळाले. त्यांच्या लोणच्यांची खासियत म्हणजे ते पूर्णपणे घरगुती आणि पारंपरिक पद्धतीने मडक्यात तयार केले जाते. कोणत्याही प्रकारच्या मशीनचा वापर केला जात नाही. केमिकलमुक्त (रसायनमुक्त) आंबे, घाण्यावर काढलेलं तेल आणि घरच्या घरी तयार केलेले मसाले यांचा वापर करून लोणचं तयार केलं जातं. कैरी व्यवस्थित वाळवूनच लोणचं तयार केलं जातं, त्यामुळे त्याची चव आणि टिकाऊपणा कायम राहतो.

त्यांच्या या मडक्यातील लोणच्यांना महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये मोठी मागणी मिळत असून, ग्राहकांकडून भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. सध्या त्यांच्या सोबत ४ महिला आणि २ पुरुष काम करत असून, या व्यवसायातून त्यांना रोजगाराची संधी मिळाली आहे.

आज मंगला वाकचौरे यांच्या लोणच्यांची मागणी केवळ स्थानिक पातळीपुरती मर्यादित नसून, त्यांचे उत्पादन बेंगळुरूपर्यंत पोहोचले आहे. त्यांना दररोज ५० ते १०० किलोपर्यंत लोणच्यांच्या ऑर्डर्स मिळत असल्याची माहिती त्यांनी दिली.

महालक्ष्मी सरस २०२६ मधील त्यांच्या या यशस्वी विक्रीमुळे पारंपरिक, घरगुती पद्धतीने बनवलेल्या उत्पादनांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. मंगला वाकचौरे यांची ही यशोगाथा ग्रामीण भागातील महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## आळंदीत 'कर बॉम्ब'चा स्फोट; वाढीव मालमत्ता कराविरोधात नागरिक आक्रमक

आळंदी (दै. संध्या)

आळंदी नगरपरिषदेने राबविलेल्या नवीन मालमत्ता कर आकारणीमुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, हा विषय आता थेट वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अचानक झालेल्या भरमसाठ करवाढीविरोधात राष्ट्रवादीच्या नगरसेविका उज्ज्वला दीपक काळे यांनी मुख्याधिकाऱ्यांना लेखी हरकतीचे पत्र देत प्रशासनाला जाब विचारला आहे.

नगरपरिषदेकडून नुकतीच मालमत्ता कराची पुनर्रचना करण्यात आली असून, त्यानुसार नागरिकांना नवीन कर आकारणीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. मात्र, या वाढीव कराचे निकष नेमके काय आहेत, याबाबत प्रशासनाकडून कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. विशेषतः व्यावसायिक (कमर्शियल) मालमत्तांच्या कर गणनेत कोणती पद्धत वापरण्यात आली, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत एवढी मोठी करवाढ सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आळंदीकरांमध्ये नाराजी वाढत असून, अनेक ठिकाणी संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका उज्ज्वला काळे यांनी दिलेल्या पत्रात, कर आकारणीचे निकष तातडीने जाहीर करावेत, व्यावसायिक मालमत्तांच्या कर गणनेचा खुलासा करावा आणि वाढीव कराचे पुनर्मूल्यांकन करून तो कमी करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच ही करवाढ तात्काळ रद्द करावी, अशीही मागणी पुढे आली आहे.

दरम्यान, या प्रकरणावर नगरपरिषद प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण आळंदीकरांचे लक्ष लागले असून, नागरिकांना दिलासा मिळणार की संघर्ष अधिक तीव्र होणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# व्यवसायात मूल्यांचे निर्विवाद महत्त्व : रमेश अग्रवाल

## पुणे ब्रदरहुड फाउंडेशनच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा संपन्न

पुणे (दै. संध्या)




व्यवसायात तसेच एकूण जीवनातही मूल्यांचे महत्त्व निर्विवाद आहे. मूल्यांचे पालन व्यक्तीला अपार शक्ती प्रदान करते, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मूल्यांशी तडजोड करता कामा नये, असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक व वायुसेनेचे निवृत्त अधिकारी रमेश अग्रवाल यांनी केले.

पुणे ब्रदरहुड फाउंडेशनच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी उद्योजक नरेंद्र गोयल यांनी माजी अध्यक्ष सागर अग्रवाल यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली.

या कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष ईश्वरचंद गोयल, कार्यकारी संचालक पवन बंसल, संजय अग्रवाल, सेवा भारती पश्चिम महाराष्ट्रचे कोषाध्यक्ष सुधीर जावळेकर, द्वारका जालान, जीतो एपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी, मनोज छाजेड, सीए जितेश अग्रवाल, रूची गोयल, गीता गोयल, कांता गोयल, रामशरण गुप्ता, प्रेमचंद मित्तल, जय भगवान गोयल यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

रमेश अग्रवाल म्हणाले की, प्रत्येक उद्योजक आपल्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी एक ठराविक दृष्टीकोन ठेवतो आणि त्यानुसार कार्यपद्धती ठरवतो. त्याचप्रमाणे व्यवसाय करताना मूल्यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. व्यवसायात मूल्यांचा पाया नसेल, तर त्या दृष्टीकोनालाच धक्का बसू शकतो.

कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितले की, कोणत्याही व्यवसायाच्या यशामध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांना केवळ कर्मचारी म्हणून नव्हे, तर सहकारी म्हणून वागणूक द्यावी. त्यांना कुटुंबाचा भाग मानल्यास त्यांच्यात आपलेपणा निर्माण होतो आणि ते प्रत्येक परिस्थितीत ठामपणे सोबत उभे राहतात.

ते पुढे म्हणाले की, "शंभर मूर्तींची पूजा करण्यापेक्षा शंभर हातांना कौशल्य देणे अधिक महत्त्वाचे आहे." कुशल हात स्वतःच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठे योगदान देतात.

नवीन अध्यक्ष नरेंद्र गोयल यांनी सांगितले की, पुणे ब्रदरहुड फाउंडेशनने गेल्या २७ वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. या मंचाच्या माध्यमातून समाजातील लोकांना वैयक्तिक व व्यावसायिक नातेसंबंध विकसित करण्याची संधी मिळते. त्यांनी आपल्या कार्यकाळात कार्यक्रमांची संख्या वाढविणे, सदस्यांचा सहभाग वाढविणे, महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीला संस्थेशी जोडण्याचा संकल्प व्यक्त केला.

नवी कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : नरेंद्र गोयल (अध्यक्ष), अरविंद अग्रवाल (सचिव), संदीप पी. अग्रवाल – सीए (कोषाध्यक्ष), योगेश जैन (संयुक्त सचिव), सागर अग्रवाल (आयपीपी), संजय बी. अग्रवाल (उपाध्यक्ष), मुकेश कानोडिया (उपाध्यक्ष–१), संजय बंसल, अरुण कुमार सिंघल, राकेश अग्रवाल, प्रशांत अग्रवाल, जितेंद्र बंसल, राजेश एस. मित्तल, शैलेश अग्रवाल, अजय जिंदल, अनूप गर्ग.